MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.
दिशा

वर्ष सत्ताविसावे/अंक २/फेब्रुवारी २०२६

# संपादकीय

## दूरचित्रवाणीची शतकी वाटचाल

दूरचित्रवाणी संच आता घराघरांत पोहोचला आहे. बातम्या, मालिका, सिनेमा या संचावर कधीही पाहता येतात. ही प्रगती मागील १०० वर्षांत झालेली आहे. २६ जानेवारी १९२६ रोजी स्कॉटलंडमधील जॉन लोगी बेअर्ड (John Logie Baird) नावाच्या अभियंत्याने लंडनच्या रॉयल सोसायटीच्या सभागृहात पहिले दृकश्राव्य प्रसारण यशस्वीपणे करून दाखविले. तसे पाहिले तर, विद्युत चुंबकीय किरणांचा वापर करून ध्वनी प्रसारण रेडिओच्या माध्यमातून त्या आधीपासून यशस्वीपणे सुरू होते. परंतु ध्वनी आणि चित्र अशा दोन बाबींचे एकत्र मुद्रण करणे आणि प्रसारण करणे तेव्हा शक्य नव्हते. असे करणे शक्य आहे हे बेअर्ड यांनी दाखवून दिले. म्हणूनच जॉन लोगी बेअर्ड यांना टेलिव्हिजनच्या निर्मितीचे श्रेय दिले जाते. त्यांच्या या संशोधनाचा उपयोग... ब्रिटिश ब्रॉडकॉस्टिंग कॉर्पोरेशन (British Braodcasting Corporation) या संघटनेने १९३६ मध्ये टेलिव्हिजन प्रसारण सुरू केले.

दुसऱ्या महायुद्धामुळे टेलिव्हिजन तंत्रज्ञानाची प्रगती जरा खुंटली. त्या काळात युद्धाला उपयोगी पडतील अशी यंत्रे बनविण्याकडे कल होता. महायुद्धाच्या समाप्तीनंतर पुहा टेलिव्हिजन प्रसारणाला महत्त्व प्राप्त झाले. १९५० च्या दशकात ध्वनीचित्र मुद्रण, त्यांचे प्रसारण आणि चित्रवाणी संचात त्यांचे प्रगटीकरण या बाबतीत अनेक सुधारणा करण्यात आल्या. त्यामुळे युरोप खंडात टेलिव्हिजनचा मोठ्या प्रमाणावर प्रसार झाला. १९६० च्या दशकात रंगीत प्रसारण सुरू झाले. भारतात टेलिव्हिजनचे पहिले प्रसारण १९५९ साली दिल्लीत सुरू झाले. १९७६ मध्ये दूरदर्शनची स्थापना झाली. तेव्हापासून भारताच्या विविध भागांत टेलिव्हिजन प्रसारण दिसू लागले.

भारतात दूरदर्शन सुरू झाले तेव्हा ते ब्लॅक अँड व्हाईट स्वरूपात होते. या प्रसारणाची वेळ देखील मर्यादित होती. १९८३ ला भारताने एशियाड खेळ स्पर्धा भरविली होती. तेव्हापासून आपल्या देशात रंगीत प्रसारण सुरू झाले. सुरुवातीच्या काळात उंच मनोरा उभा करून त्याद्वारे प्रसारण केले जायचे. हवेत सोडलेल्या या विद्युत चुंबकीय लहरी पकडण्यासाठी घरोघरी ॲल्युमिनिअम दांड्याचा वापर करून बनविलेले अँटेना वापरले जात असत. त्यात बदल होऊन केबल टीव्हीचा आपण वापर करू लागलो. आजच्या घडीला इंटरनेटच्या मदतीने कार्यक्रम पाहिले जात आहेत. त्यामुळे

(मुखपृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून – **संपादकीय**)

२४ तास सेवा उपलब्ध आहे. दूरचित्रवाणी संचात देखील खूप बदल झाले. कॅथोड रे ट्यूबचा वापर करून बनविलेल्या लांबट पेटीपासून आता एलइडी वापरून भिंतीवर लावायच्या पातळ दूरचित्रवाणी संचापर्यंत तंत्रज्ञानाने मजल मारलेली आहे.


सुरुवातीच्या काळात दूरचित्रवाणीचे प्रसारण मर्यादित काळासाठी उपलब्ध होते. आता ते २४ तास उपलब्ध झाले आहे. तसेच, प्रसारण करणाऱ्या वाहिन्यांची संख्या देखील मर्यादित होती. ती आता भरमसाठ वाढली आहे. यावर बातम्या, मालिका, चित्रपट यांचा सतत भडीमार चाललेला असतो. यातील कोणते कार्यक्रम आपण निवडावेत यांचे तारतम्य बाळगणे आवश्यक आहे. विशेषतः घरात किशोरावस्थेतील मुले असतील तर कार्यक्रमाची निवड विचारपूर्वक करावी लागते.

दूरचित्रवाणी हे ज्ञानदानाचे प्रभावी माध्यम आहे. याच्या माध्यमातून नवनवीन माहिती प्रेक्षकांना उपलब्ध करून देता येते. या संदर्भात 'भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने' (Indian Space Research Organization) १९७० च्या दशकात एक पथदर्शी प्रयोग हाती घेतला होता. हा प्रयोग १ ऑगस्ट १९७५ ते ३१ जुलै १९७६ या कालावधीत देशाच्या २०० गावांमध्ये राबविण्यात आला होता. त्याला 'उपग्रह शिक्षण टेलिव्हिजन प्रयोग' (Satellite Instructional Television Experiment) असे समर्पक नाव देण्यात आले होते. गावागावांमध्ये कार्यक्रम पोहोचविण्यासाठी नासाच्या एटीस ६ या उपग्रहांची मदत घेण्यात आली होती. आरोग्य, शेती, स्वच्छता, कुटूंब नियोजन अशा समाजोपयोगी विषयांवर कार्यक्रम करून दिवसांच्या ठरावीक वेळेला त्यांचे प्रसारण केले जायचे. या प्रयोगाला खूपच चांगला प्रतिसाद मिळाला. परंतु अशा प्रकारचे फारसे कार्यक्रम अलीकडे होताना दिसत नाहीत. नॅशनल जिओग्राफिक, डिस्कवरी या वाहिन्या त्यांची भरपाई करण्याचा प्रयत्न करतात. परंतु या वाहिन्या पाहणाऱ्यांची संख्या आपल्या देशात फारच मर्यादित आहे.

इंग्लंडच्या मुक्त विद्यापीठाने दूरचित्रवाणीचा फारच शिताफीने उपयोग करून घेतला आहे. इंग्लंडच्या 'मिल्टन किन्स' या शहरात मुक्त विद्यापीठाचे मुख्यालय आहे. या विद्यापीठाच्या आवारात बिबिसीचे एक केंद्र आहे. विद्यापीठाच्या वेगवेगळ्या विभागांसाठी ते कार्यक्रम तयार करतात आणि त्याचे प्रसारण करतात. १८३१ ते १८३७ या कालावधीत चार्ल्स डार्विन यांनी बिगल जहाजात प्रवास करून वेगवेगळ्या सजीवांचे अनेक नमुने गोळा केले. त्यांचा सांगोपांग विचार करून १८५८ मध्ये त्यांनी उत्क्रांतीचा सिद्धांत मांडला. या सिद्धांताने जीवशास्त्राला एक नवीन दिशा दिली. हे कार्य त्यांनी ज्या जहाजातून केले तसेच एक जहाज घेऊन संपूर्ण प्रवास पूर्ण करण्यात आला. मुक्त विद्यापीठाच्या तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे चित्रीकरण करण्यात आले. हे चित्रिकरण फारच उद्बोधक आहे. त्याचबरोबर एक 'अनसंग हिरोज' (Unsung Heroes) नावाची एक मालिका मुक्त विद्यापीठाने तयार केली. या मालिकेत फारसे प्रसिद्ध न झालेले जे संशोधक होते त्यांची माहिती देण्यात आली. त्यांच्या गावी जाऊन त्यांनी केलेले प्रयोग करून दाखविण्यात येतात. त्यातून दर्शकाला खूप महत्त्वाची माहिती मिळते. असे कार्यक्रम आपल्या देशात देखील तयार करण्याची गरज आहे. तरच या माध्यमाचा प्रभावी उपयोग झाला असे म्हणता येईल.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

●●●



व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष सत्ताविसावे / अंक २ / फेब्रुवारी २०२६



**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष ३० वे/अंक ८ वा)



**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**
**vpmt1935@gmail.com**



**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : ९१५२४८७७६५**
**Email:perfectprints@gmail.com**


## *अनुक्रमणिका*


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | आय एन एस व्ही कौंडिण्य : भारताच्या प्राचीन सागरी सफरीचे पुनरुज्जीवन | शांभवी थिटे | २ |
| ३) | जागतिक वारसा स्थळ नामांकित गड किल्ल्यांचा परिचय किल्ले तोरणा | दिलीप नारायण वंडलकर | ३ |
| ४) | आनंदाच्या ट्रेन्स | राजेश कुलकर्णी | ८ |
| ५) | पुस्तक परीक्षण : अभिराम भडकमकर यांचे, 'आभाळाचे तुकडे' | डॉ. नरेंद्र पाठक | १० |
| ६) | होशवालोंको ख़बर क्या ... | वसुंधरा काशीकर | १२ |
| ७) | परिसर वार्ता | संकलित | १५ |



या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# आय एन एस व्ही कौंडिण्य : भारताच्या प्राचीन सागरी सफरीचे पुनरुज्जीवन

*नुकतेच भारताच्या नौदलामध्ये आय एन एस व्ही या संपूर्णपणे भारतीय बनावटीच्या नौकेचा समावेश झाला या ऐतिहासिक क्षणावर भाष्य करणारा लेख – संपादक*

'आयएनएसव्ही कौंडिण्य' हा केवळ भारतीय नौदलात दाखल झालेला एक नवीन नौका-प्रकल्प नाही, तर भारताच्या प्राचीन सागरी परंपरेचा जिवंत आणि चालता-बोलता दस्तऐवज आहे. हजारो वर्षांपूर्वी भारतीय उपखंडातील लोकांनी समुद्राला केवळ अडथळा न मानता संधी म्हणून पाहिले होते, याचा हा ठोस पुरावा आहे. या जहाजाविषयीची विशेष उल्लेखनीय बाब अशी की, अजंठा लेण्यांमधील पाचव्या शतकातील भित्तिचित्रांमध्ये दिसणाऱ्या जहाजांच्या रचनांचा तपशीलवार अभ्यास करून हे जहाज तयार करण्यात आले आहे. त्या काळात भारताचा आग्नेय आशिया, अरबी द्वीपकल्प आणि आफ्रिकेशी सागरी व्यापार होता, हे अनेक ऐतिहासिक संदर्भांतून स्पष्ट होते. 'कौंडिण्य' या प्राचीन भारतीय नाविकेवर आधारित आयएनएसव्ही कौंडिण्य हे जहाज, भारतातून समुद्रमार्गे बाहेर पडलेल्या सांस्कृतिक, धार्मिक आणि व्यापारी संपर्कांची आठवण करून देते. त्यामुळे हे जहाज केवळ भूतकाळाचे स्मारक नसून, भारताच्या सागरी आत्मविश्वासाचे प्रतीक ठरते.

आयएनएसव्ही कौंडिण्यचे खरे वैशिष्ट्य त्याच्या बांधणीच्या पद्धतीत आहे. आधुनिक लोखंडी किंवा स्टीलच्या जहाजांप्रमाणे खिळे किंवा वेल्डिंग न करता, हे जहाज पूर्णपणे पारंपरिक 'स्टिच्ड शिप' म्हणजेच शिवण पद्धतीने बांधलेले आहे. लाकडी फळ्या नारळाच्या दोऱ्यांनी, नैसर्गिक तंतू राळेच्या सहाय्याने एकमेकांना जोडण्यात आले आहेत. या पद्धतीमुळे जहाजाचा घड लवचिक राहतो आणि समुद्रातील लाटांचा ताण सहजपणे सहन करू शकतो. प्राचीन काळातील दीर्घ समुद्रप्रवासांसाठी ही लवचिकता अत्यंत उपयुक्त होती. या तंत्रामुळे दुरुस्तीही तुलनेने सोपी होती, कारण संपूर्ण रचना मोडण्याची गरज पडत नसे. आजच्या काळात ही पद्धत पुन्हा वापरात आणल्यामुळे केरळसह भारताच्या किनारी भागांतील पारंपरिक सुतार आणि कारागिरांच्या पिढ्यान्‌पिढ्यांच्या ज्ञानाला नव्याने प्रतिष्ठा मिळाली आहे.



आयएनएसव्ही कौंडिण्यची निर्मिती ही प्राचीन परंपरा आणि आधुनिक विज्ञान यांचा सुंदर संगम म्हणता येईल. भारतीय नौदल, संस्कृती मंत्रालय, इतिहास तज्ज्ञ, अभियंते आणि पारंपरिक जहाजनिर्माते यांनी एकत्र येऊन हा प्रकल्प साकार केला आहे. अजंठ्यातील दोन-आयामी चित्रांवरून जहाजाचा त्रिमितीय आकार ठरवणे हे मोठे आव्हान होते. त्यासाठी आधुनिक जलगतिक चाचण्या, संरचनात्मक विश्लेषण आणि सुरक्षिततेचा आधुनिक मापदंड वापरण्यात आला आणि त्यातही

(पृष्ठ क्र. ७ वर)

# जागतिक वारसा स्थळ नामांकित गड किल्ल्यांचा परिचय
# किल्ले कोंढाणा म्हणजेच सिंहगड

*सिंहगड! फक्त एक उंच डोंगर किंवा सुपरिचित दुर्ग नाही, तर तो आपल्या मातीतील शेकडो वर्षांच्या रंजक इतिहासातील महत्त्वाचा शिलेदार आहे. ह्या प्राचीन दुर्गाने अनेक राजवटी अनुभवल्या, हर्ष - खेदाचे अनेक प्रसंग इथे घडले. इतिहासाला कलाटणी देणाऱ्या घटनांचा हा किल्ला साक्षीदार आहे. सिंहगड समजून घेतांना तो प्राक्प्राचीन, सातवाहन, चालुक्य, शिलाहार, यादव, तुघलक, निजाम, आदिल-शिवकाल- मोगल, पेशवाई, इंग्रज व आधुनिक असा वळणावळणाने होत आपल्यापर्यंत पोहोचतो. किल्ले कोंढाणाचा नुकताच युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळ यादीत समावेश करण्यात आला आहे. त्याचीच माहिती आपण या लेखात पाहणार आहोत. - संपादक*

**कोंढाणा म्हणजेच सिंहगड**

प्राक्प्राचीन काळ - त्या काळी कौंडण्यश्रुषी इथे तपश्चर्या करीत होते. त्यांचा आश्रम व गुरुकुल इथेच होते. आजही किल्ल्याच्या सर्वोच्च शिखराजवळचे कोंढाणेश्वर मंदिर व किल्ल्याच्या आग्नेयेस कोंढणपूर गाव आहे.

सातवाहन काळ - कोंढाण्यावरील अवशेषांचा विचार केला, तर हा किल्ला सातवाहन काळापासून अस्तित्वात असावा असे दिसते. त्या काळची खांब सोडून कोरलेली बरीच टाकी इथे पाहायला मिळतात. त्यावरून दोन हजार वर्षांपूर्वी इथे माणसांचा वावर होता. त्यांची संख्या बरीच असल्याने वर्षभर पाणीपुरवठा होण्यासाठी इतक्या संख्येने ही टाक्या खोदल्या गेल्या. माणसं राहू शकतील अशा खोदीव गुहा इथे आढळत नाहीत. तेंव्हा ही माणसं कदाचित झोपड्या बांधून राहात असावीत. सध्या या जागेचा उल्लेख 'घोड्यांची पागा' म्हणून केला जातो.

यादव काळ - पुणे बाजूचा सर्वांत वरचा किंवा तिसरा दरवाजा आपल्यास त्या काळात घेऊन जातो.

तुघलक काळ - इ.स. १३२८ मध्ये या किल्ल्यावर नागनायक नांवाचा एक कोळी किल्लेदार होता. मुहम्मद तुघलकाने दिल्लीची राजधानी देवगिरीवर हलवली आणि आजूबाजूचा मुलुख ताब्यात आणण्यासाठी मोहिमा काढल्या. त्याच काळात त्याने कोंढाण्याला वेढा दिला. नागनायकाने आठ महिने किल्ला लढवला, पण गडावरचा दाणागोटा संपल्याने त्याने गडाचा ताबा सोडला. हा प्रसंग १३५० मध्ये 'शहानामा - इ - हिंद' या फारसी काव्यात रंगवून सांगितला आहे.

शिवप्रताप काळ - मार्च १६४७ ! मुतालिक दादोची कोंडदेवांचा पुणे मुक्कामी मृत्यू झाला. आदिलशाहीतर्फे किल्ले कोंढाण्याचे सुभेदार म्हणून दादोजी नामजद असल्याने ते असेपर्यंत शिवबांना कोंढाणा घर-आंगण होते. येणारा नवा सुभेदार अडचणीचा ठरेल, त्यातून निर्माण होऊ शकणाऱ्या कटकटी उद्भवायलाच नकोत म्हणून खेड-शिवापूरचे हवालदार बापूजी नन्हेकर आणि किल्लेदार सिद्दी अंबर यांच्यामध्ये असलेल्या स्नेहाच्या बळावर शिवबांनी सिद्दी अंबरला आपल्याकडे ओढून घेतले आणि एका सुमुहूर्तावर कोंढाणा स्वराज्यात दाखल करून घेतला. आता राजांचा किल्लेदार म्हणून सिद्दी किल्ल्याची व्यवस्था बघू लागला (एप्रिल १६४७).

राजांचा पसारा दिवसेंदिवस वाढतच होता. त्यांच्या महत्त्वाकांक्षेस पायबंद म्हणून आदिलशहाने जिंजीच्या वेढ्यात गर्क असलेल्या शहाजीराजेंना कपटाने कैद केले. याला शह म्हणून शिवबांनी अहमदाबादेतील मुघल शहजादा मुरादशी संधान बांधून शहाजीराजांना दिल्ली दरबारची खिल्लत आणि राजा हा किताब मिळवून

देत आदिलशहावर दडपण आणले. या दडपणाला बळी पडून कोंढाण्याच्या बदल्यात पिताश्री शहाजीराजेंची सुटका करवून घेतली (मे १६४९). या घटनेला आता अकरा वर्षे उलटून गेली होती. मोगल सरदार शाहिस्तेखान दक्षिणेत आला. शहाजीराजेंनी दिल्लीपतींचा पुढचा वार विजापूरवर पडेल, तेंव्हा दक्षिणेतील राजांनी वैरभाव विसरून त्याचा एकजुटीने सामना करावयास हवा, असे आदिलशहास सुचविले. आदिलशहास शहाजींचे म्हणणे पटले आणि शिवबाराजेंनी जिंकलेले किल्ले त्यांचाचकडे राहू देण्यास व मोघलांविरुद्ध लढण्यात मदत करण्याचे आश्वासन देत तसा तह करून घेतला. 'बाप बाप होता है' या म्हणीची प्रचिती सर्वांनाच आली आणि कोंढाणा परत स्वराज्यात दाखल झाला (सन १६६२). याचा फायदा शिवबांना लवकरच झाला. पुणे मुक्कामी लाल महालात वास्तव्यास असलेल्या शाहिस्तेखानावर रात्री छापा टाकून त्याची तीन बोटे कापून काढली आणि काही कळायच्या आत जवळच्या कोंढाण्यावर पोहोचले (५ एप्रिल १६६३). खानाची फौज मागावर होतीच. पण ती फारशी नव्हती. राजांनी गडाचे दरवाजे उघडे ठेवायला सांगितले. तटावर माणूस दिसत नव्हता आणि भगवे निशाणही फडकत नव्हते. मोकळे दरवाजे आणि निर्मनुष्य तट बघून खानाचे सैन्य पुढे झेपावले. शिवबा गड सोडून पळाला, असाच त्यांचा समज होता. खानाचे सैन्य गडाशी भिडताच, अचानक 'हर हर महादेव'च्या घोषणांनी कोंढाणा भरून गेला. तोफांच्या आवाजाने गड दुमदुमू लागला. मुघलांचा आघाडीचा हत्ती तोफेच्या गोळ्यात सापडला. गडाच्या दरवाजातून राजांचे घोडदळ बाहेर पडतांना नजरेत आले. झाले! खानाची फौज जीव घेऊन पळू लागली. राजे हा विजय गडावरून बघत होते. शाहिस्तेखानाने तीन दिवसांनंतर जसवंतसिंगाकडे सूत्रे सोपवित पुण्याचा तळ सोडला (८ एप्रिल १६६३). जसवंतसिंगाने कोंढाण्यास वेढा दिला. शिवबांना त्याच्या बुद्धीची कीव आली. कोंढाणा सुरक्षित असणार ही खात्री बाळगूनच राजांनी कोंढाण्याजवळून जात सुरत गाठले. सुरतेची बेसूरत केली आणि अमाप संपत्ती घेऊन परत स्वराज्यात दाखल झाले. कोंढाणा अभेद्य होता. आता त्याचा गळफास सोडवणे आवश्यक होते. शिवबांनी १४ एप्रिल १६६४ रोजी जसवंतसिंगावर सणसणीत हल्ला चढवला. शेवटी नामुष्की पदरात घेत जसवंतसिंगाने कोंढाण्याचा वेढा उठवला (२८ मे १६६४). बहाद्दूर मावळ्यांच्या पाठीवर थाप देण्यासाठी स्वतः शिवराय गडावर येऊन गेले (३० एप्रिल १६६४).

शाहिस्तेखानाची फजिती, सुरतेची लूट आणि जसवंतसिंगाचा पराभव या बातम्यांनी दिल्लीकर औरंगजेब अस्वस्थ झाला. त्याने दक्षिणेतील पुढील कारवाईसाठी धूर्त, हट्टी मिर्झाराजे जयसिंग आणि कपटी - दीर्घद्वेषी दिलेरखान या जोडगोळीला नामजद केले. मोगल सैन्याशी दोन हात करण्यापेक्षा, जेवढं जमेल तेव्हढं स्वराज्य वाचवावं या उद्देशातून शिवबांनी पुरंदरचा अपमानास्पद तह स्वीकारला. त्या तहान्वये तेवीस किल्ले मोगलांना द्यावे लागले. त्यात कोंढाण्याचाही समावेश होता. १४ जून १६६५ पासून मोगलांनी किल्ल्याचा ताबा घेतला. कोंढाण्याच्या ऐकलेल्या दुर्गमतेबद्दल खात्री करून घेण्यासाठी स्वतः मिर्झाराजा २१ सप्टेंबर १६६५ रोजी कोंढाण्यावर मुक्कामासाठी आला.

यानंतर घडलेली आदिलशाही मोहीम, त्यात मोगलांतर्फे शिवबांचा सहभाग, त्यातूनच उद्भवलेली आग्रा भेट, तिथे नशीबी आलेली कैद, युक्तिने त्यातून करून घेतलेली सुटका, मायदेशी परतणं या महत्त्वाच्या घटना राजांनी अनुभवल्या. त्यानंतर सावधगिरी म्हणून दोन-अडीच वर्षे शिवबांनी फारशी हालचाल केली नाही. हा काळ स्थिरस्थावर होण्यास आणि पुढच्या भरारीसाठी भक्कम तयारी करण्यात घालवला. थोडीशी उसंत मिळताच मांसाहेबांना प्रिय असणारा कोंढाणा घेण्याची जबाबदारी शिवबांनी सुभेदार तानाजी मालुसरेंवर

सोपवली. तानाजी आपल्या पाचशे मावळ्यांसोबत रात्रीच्या प्रहरात किल्ल्याच्या दक्षिण दिशेला असलेला उभा कडा वानरांप्रमाणे चढत तटावर पोहोचले आणि ताबडतोब पहारेकऱ्यांना कापून काढत कल्याण दरवाजा उघडला. इथून सूर्याजी इतर मावळ्यांसोबत किल्ल्यात आला. मात्र गड सावध होताच एकच धुमश्चक्री उडाली. तानाजी व उदयभान एकमेकांसमोर उभे ठाकले. उदयभान चवताळून तानाजीवर वार करू लागला. त्या वारांना ढालीवर झेलत असतांना ती तुटली. मात्र न घाबरता तानाजींनी लढाई जारी ठेवली. एकमेकांच्या नरडीचा घोट घेण्यासाठी दोघेही उतावीळ झाले. त्यात एकाचवेळी दोघांचेही जीवघेणे वार एकमेकांवर पडले. उदयभान ठिकाण्यावरच गतप्राण झाला; तर तानाजींचा हात तुटून ते खाली कोसळले आणि अती रक्तस्रावाने धारातीर्थी पडले. आता सूर्याजीने लढाईची सूत्रे हाती घेतली. पळू पाहणाऱ्या मावळ्यांना ललकारले, 'इथे तुमचा बाप मरून पडला आणि तुम्ही पळता?' मात्रा बरोबर लागू झाली. मावळ्यांनी जोशात मारा केला आणि गड जिंकून घेतला. जिंकल्याची खूण म्हणून गवताची पेंडी पेटवली. निरभ्र आकाशात धुमकेतूप्रमाणे चमकणारी ती खूण बघताच राजगडावर एकच जल्लोष उडाला. झुंजूमुंजू होण्याच्या आधीच शिवबाराजे राजगडावरून निघाले. कोंढाण्यावर त्यांचे मावळ्यांनी खालच्या मानेने मुजरा देत स्वागत केले. सगळीकडे स्मशानशांतता होती. काहीतरी अघटित घडल्याचे शिवबांना जाणवले. सूर्याजी म्लान वदनाने तानाजीच्या निळ्या शेल्याने पांघरलेल्या कलेवराजवळ बसला होता. मोहिमेवर पाठवतांना सुभेदारांना दिलेला तो निळ्या रंगाचा तो शेला बघताच राजांना भडभडून आले आणि त्यांच्या तोंडून उत्स्फूर्त बोल बाहेर पडले, ''गड आला, पण सिंह गेला'' (४ फेब्रुवारी १६७०). यावरून कोंढाण्याचे नांव सिंहगड पडले अशी जनश्रुती असली तरी त्याच्या कितीतरी आधी म्हणजे १६५६ साली शिवबांनी इतर किल्ल्यांसोबतच याही किल्ल्याचे नवीन नामकरण सिंहगड असे केल्याचे इतिहास सांगतो. आत्ताच्या घडीला सिंहगडावर तानाजीचे जे स्मारक आहे, ती जागा म्हणजे जिथे तानाजीने हौतात्म्य पत्करले ते ठिकाण होय. शिवकाळात तिथे एक वीरगळ उभारलेले होते.

मोठ्या शर्तीने जिंकून घेतलेला हा गड छत्रपती संभाजी महाराजांच्या क्रूर हत्येनंतर पुन्हा मोगलांकडे गेला. पुढे १ जुलै १६९३ रोजी नानाजी बलकवडे आणि विठोबाजी कारके या पंचहजारी सरदारांनी माळा आणि शिड्या लावून तो जिंकला. याच गडावर ३ मार्च १७०० रोजी शिवबाराजेंचे धाकटे चिरंजीव राजाराम महाराजांचा अवघ्या तिसाव्या वर्षी मृत्यू झाला. काळाने परत कूस पलटवली. २७ डिसेंबर १७०२ रोजी औरंगजेबाच्या सैन्याने सिंहगडाला वेढा दिला आणि साडेतीन–चार महिन्यांच्या प्रयत्नानंतर तो मोगलांच्या हाती लागला. १८ एप्रिल १७०३ रोजी स्वतः औरंगजेबाने गडावर पाय ठेवले. या प्रसंगी सिंहगडाचे बक्षिदांबक्ष असे नामांतर झाले; पण ते फार काळ टिकले नाही. एप्रिल १७०५ मध्ये पंताजी शिवदेव, त्रंबक शिवदेव आणि रामाजी फाटक यांनी तो सर केला आणि मोगल किल्लेदार देवीसिंह याला कैद केले.

पेशवाई – औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मोगली छावणीतून संभाजीपुत्र शाहूची सुटका करण्यात आली. त्यामुळे उद्भवलेल्या कौटुंबिक कलहातून कोल्हापूर व सातारा अशा दोन ठिकाणी शिववैभव विखूरले गेले. १७४९ मध्ये छत्रपती शाहूंचे देहावसान झाले. त्यानंतर झालेल्या तडजोडीतून ६ जुलै १७५० रोजी सिंहगड पेशव्यांच्या ताब्यात आला आणि पेशवाई संपुष्टात येईपर्यंत तो त्यांचाचकडे राहिला. सिंहगडाने १७५१ मधील दमाजी गायकवाडांची पुणे स्वारी, १७६३ मधील निजामाची स्वारी, १७६९ मधील जानोजी भोसल्यांची स्वारी अनुभवली. अशा अडचणींच्या वेळी पेशवे,

पुण्यातील श्रीमंत, सरदार, सावकार या सर्वांना सुरक्षिततेसाठी सिंहगडाचाच आसरा होता. अशाच धामधुमीत नारायणराव पेशव्यांचा २२ एप्रिल १७६३ रोजी गंगाबाईंशी सिंहगडावर विवाह झाला.

इंग्रज व त्यानंतरचा काळ– पेशवाईनंतर सिंहगडाचा ताबा २ मार्च १८१८ रोजी जनरल प्रिट्झलरने मिळवला. त्यानंतर त्याने लुटता येण्याजोगे लुटले, पाडत्या येण्याजोग्या सर्व बांधकामांवर वरवंटा फिरवला, पाण्याच्या साठ्यांचीही वाट लावली आणि गडावर येणारे सर्व रस्ते उद्ध्वस्त केले. साहजिकच गडाचा राबता तुटला आणि गड ओसाड पडला. अशीच पाऊणशे वर्षे गेली आणि लोकमान्य टिळकांनी १८८९ साली रामलाल नंदराम नाईक यांच्याकडून जागा खरेदी करून सिंहगडावर लहानसे विश्रामधाम बांधले. इथेच त्यांनी 'आक्टिक होम इन वेदाज' या ग्रंथाचे लेखन केले. इ.स. १९१५ मध्ये 'गीतारहस्य' या प्रख्यात ग्रंथाची मुद्रणप्रत येथेच तयार झाली. याच साली त्यांची महात्मा गांधींशी भेट याच विश्रामधामात झाली. लोकमान्यांच्या वास्तव्याने सिंहगडास नवचेतना प्राप्त झाली. त्यांच्या जहाल मताची मशाल १९२० पर्यंत म्हणजे त्यांच्या मृत्यूपर्यंत पेटली होती आणि तिची धग पुढेसुद्धा कायम होती.

सन १९३७ साली सुभाषचंद्र बोस म. गांधींच्या विचारसरणीला विरोध करून काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवडून आले. परंतु आपलेच म्हणणे खरे करून दाखवण्यासाठी म. गांधींनी संपूर्ण असहकार करत त्यांची गळचेपी केली. या दंडेलीला कंटाळून सुभाषचंद्रांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आणि मुंबईला जाऊन दादरच्या शिवाजी पार्क भागात राहणाऱ्या स्वातंत्र्यवीर सावरकरांशी सल्लामसलत केली. तेव्हा, 'शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या किल्ल्यावर एखाद्या जाणत्या सोबत जाऊन त्यांच्याकडून शिवचरित्राचे श्रवण करा' असा सल्ला स्वातंत्र्यवीरांनी नेताजींना दिला.

केसरीचे उपसंपादक दादासाहेब केतकर यांना सांगाती घेऊन नेताजी सिंहगडावर आले. गडदर्शन करीत असतांना केतकर त्यांना शिवरायांच्या आग्रा येथील कैदेतून सुटकेचे प्रकरण सांगत होते तेव्हा नेताजी कल्याण दरवाजापाशी होते. नंतर बंगाली भाषेत रवींद्रनाथ ठाकूरांनी रचलेले शिवकाव्य ते स्वतःशी पुटपुटत जणूकाही शिवसमाधीत गेले. त्यानंतर एक चकार शब्दही न बोलता ते पुण्यास परतले. नंतर त्यांचं कलकत्त्यास जाणं, तिथे ब्रिटिशांच्या नजरकैदेत पडणं, आजारपणाचे सोंग घेऊन नंतर पठाणाच्या वेषात काबुलमार्गे जर्मनीत पोहोचणं, हिटलरशी बोलणं, पुढे पाणबुडीतून जपानला जाणं, सिंगापूरला आझाद हिंद सेनेची स्थापन करणं आणि 'चलो दिल्ली'चा नारा देत भारतभूचा अल्पसा भाग स्वतंत्र करण्यात यश मिळवणं या साऱ्या गोष्टी घडून आल्या. अर्थात, या सगळ्या घडामोडींचा उगम सिंहगडाचा कल्याण दरवाजा होता हे विसरता कामा नये.

कल्याण दरवाजा – हा सिंहगडाचा इतिहासकालीन मुख्य दरवाजा आहे. त्यावेळी शिरवळ हे अमिनाचे मुख्य ठाणे होते. तिथून सिंहगडावर येण्यास कल्याण दरवाजाची वाट सोयीची पडत असे. शिवकाळात राजधानी राजगडाकडे ये-जा करण्यास हाच दरवाजा सोयीचा होता. या ठिकाणी एकापुढे एक असे दोन दरवाजे आहेत. पहिला दरवाजा साधा असला तरी दुसरा दरवाजा अनेक दृष्टींनी वेगळा आहे. या दरवाज्याच्या बाहेरच्या बाजूला पुढे आलेल्या दगडांच्या दोन पट्ट्यांच्या मधल्या भागात दोन ओळींचा उठावदार अक्षरांचा मराठी शिलालेख आहे. 'श्रीमंत बाळाजी बाजीराव पंडित प्रधान, श्रीशालिवाहन शके १६७२ कारकीर्द' म्हणजे इ.स. १७५० मध्ये श्रीमंत बाळाजी बाजीराव पुत्र नानासाहेब पेशव्याने या दरवाज्याचा जीर्णोद्धार किंवा पुनर्रचना केली असावी. दाराच्या उत्तरेकडील बुरुजावर माहुतासह असणाऱ्या हत्तीचे शिल्प आहे, तर दक्षिणेकडील बाजूस बहुधा वराहाचे शिल्प

आहे. दरवाज्याच्या आतील बाजूस पहारेकऱ्याच्या देवड्या आहेत.



**कल्याण दरवाजा, सिंहगड**

पुण्याकडून किल्ल्यात येणाऱ्या वाटेवर तीन दरवाजे उभारले आहेत. पहिल्या दरवाज्याच्या बाह्य बाजूस पहारेकऱ्यांना बसण्यासाठी दोन्ही बाजूंना दोन चौकोनी जागा आहेत. येथील बुरुजांवर व्याघ्रकृतीचे शिल्प खोदलेले असून, त्याच्या चारही पायांत एकेक हत्ती पकडलेला आहे. या दरवाजातून आत आले की जरा उंचावर एक दिंडी दरवाजा आहे. त्यातून पुढे गेलो तर एक सपाटी तटबंदीने बंदिस्त केलेली आहे. हीच सिंहगडाची माची. यानंतरचा तिसरा दरवाजा महत्त्वाचा. याच्या दोन्ही बाजूंचे खांब यादवकालीन असून, त्याच्या गणेशपट्टीवर कमळे खोदलेली आहेत. इथून आत गेलो की घोडपागा, खांदकडा, दारूकोठार, तानाजी गडावर चढला तो कडा, लोकमान्यांचे विश्रामधाम, कौंडिण्येश्वर देऊळ, अमृतेश्वर मंदिर, तानाजी स्मारक, तानाजीचा हात तुटला ती जागा, उदयभानचे थडगे, राजारामाची समाधी बघता येते. गडावर अनेक टाक्या असून, त्यापैकी देवटाक्यातील पाणी अत्यंत मधुर आहे.

**– दिलीप नारायण वंडलकर**
४, नरकेसरी सोसायटी, उज्ज्वलनगर,
नागपूर – ४४००२५
मो.नं.: ९८३४६३६६५५
इ-मेल- wandalkardilipgmail.com

(पृष्ठ क्र.२ वरून – **आय. एन. एस. व्ही. कौंडिण्य: भारताच्या प्राचीन सागरी सफरीचे पुनरुज्जीवन**)

ऐतिहासिक प्रामाणिकपणा जपण्यात आला. हे जहाज प्राचीन गुजरात-अरब व्यापारमार्ग पुन्हा समुद्रातून पार करत आहे. ही मोहीम अत्यंत प्रेरणादायी आहे. अशा उपक्रमांमुळे भारताची प्राचीन जहाजनिर्मिती परंपरा केवळ अभ्यासापुरती मर्यादित न राहता, प्रत्यक्ष अनुभवांच्या पातळीवर समजून घेता येते. म्हणूनच आयएनएसव्ही कौंडिण्य हे जहाज भूतकाळाचा गौरव करताना, भविष्यासाठी आत्मविश्वास देणारे एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरते!

**– शांभवी थिटे**
संशोधक छात्र
जवाहरलाल नेहरू विद्यापीठ
दिल्ली

●●●

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**– संपादक**

# आनंदाच्या ट्रेन्स

*'The Children's Train' हा अतिशय सुंदर इटालियन चित्रपट नेटफ्लिक्सवर आला आहे. मानवी इतिहासातले हे सुंदर प्रकरण मागच्या वर्षी क्रिस्तिना कोमेंचेनी यांनी पडद्यावर आणले. संवाद इटालियन व इंग्रजीत अशा दोन्ही भाषांमध्ये ऐकण्याची सोय आहे. या चित्रपटाचे रसग्रहण करणारा लेख – संपादक*

दुसऱ्या महायुद्धानंतरचा इटली. उत्तर आणि दक्षिण भागांमध्ये आधीपासूनच आर्थिक विषमता होती. त्यातच युद्ध संपता संपता मित्र राष्ट्रांनी बरीच बाँबफेक करून दक्षिण भाग उद्ध्वस्त केला. त्यामुळे युद्ध संपल्यावर दक्षिण व मध्य भागांत उपासमारी सुरू झाली. अनेक कुटुंबांमधले पुरुष युद्धामध्ये मारले गेल्यामुळे घरची जबाबदारी बव्हंशी घरच्या स्त्रीवर. या आया आणि त्यांच्या लेखी तिन्ही त्रिकाळ भरवावी लागणारी त्यांच्या मुलांची तोंडे. अर्थातच मुलांची भूक पाहता आपल्या वाटचा घास आपसूक मुलांसमोर सरकवणाऱ्या या आया जगभरात सारख्याच असतात.




फॅसिस्टांचा पराभव होऊन १९४३ मध्येच मुसोलिनीला गोळ्या घालून त्याचा मृतदेह पेट्रोलपंपावर उलटा टांगून झाल्यावर तेथे कम्युनिस्टांचा प्रभाव वाढला होता. मात्र ते सदैव विरोधी पक्षात राहिले. साठीच्या दशकाच्या उत्तरार्धात माओ आणि चे गवेरा यांच्यापासून 'स्फूर्ती' घेत त्यांनी हिंसक कृत्ये केली; मात्र ते सत्तेत येऊ शकले नाहीत. सोविएत रशियाच्या विघटनानंतर त्यांची शक्ती क्षीण झाली.

अशा स्थितीमध्ये या दक्षिण व मध्य भागांमधील मुलांना इटलीतील सधन कुटुंबांकडे पाठवण्याची कल्पना टेरेसा नोचे या कामगार नेत्याला सुचली. ती पुढे निष्प्रभ ठरत गेलेल्या मार्क्सवादाची नव्याने मांडणी करणाऱ्या अंतोनियो ग्राम्ची याच्याबरोबरही दिसली. अशी कल्पना सुचणे आणि ती इटलीभरात अमलात आणणे यात मोठा फरक होता. मात्र तिच्या या कल्पनेला भरभरून प्रतिसाद मिळाला.

कोणते मूल कोणाच्या घरी जात आहे याच्या पक्क्या नोंदी करून झाल्यावर खास ट्रेन्सची व्यवस्था केली गेली. मात्र या योजनेत तेथील चर्चने खोडा घातला. या मुलांना क्रूरपणे वागणूक देण्यासाठी रशियात पाठवले जाईल किंवा भट्टीत टाकले जाईल अशा समजुती पसरवल्या गेल्या. ही भीती दूर करत मुलांना व त्यांच्या पालकांना आपल्या पोटच्या गोळ्यांना दूर पाठवण्यासाठी तयार करणे हे कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकर्त्यांसमोर मोठेच आव्हान होते. या काळात जवळजवळ सत्तर हजार मुलांना सधन कुटुंबांनी आश्रय दिला. याची सुरुवात म्हणून डिसेंबर १९४५मध्ये सतराशे मुलांना मिलानमधून पाठवण्यात आले. यथावकाश दक्षिणेतील सिसिली-सार्डिनिया या भागांमधूनही मुलांना पाठवण्यात आले.

यामागे आपण कोणावर मेहरबानी करतो आहोत यापेक्षा ती देशाची गरज आहे हाच भाव अधिक होता. इटलीतील तेव्हाची कुटुंबे मोठी असत. त्यामुळे सात जणांमध्ये आठवा सहज खपून जाईल, असे तेथे म्हटले

जाऊ लागले. सुरुवातीला हे पाच-सहा महिन्यांसाठी करण्याचे ठरले; मात्र काही मुले आणखी काही वर्षे नव्या पालकांकडे राहिली. या मुलांकडून 'दक्षिणेतली आई' आणि 'उत्तरेतली आई' अशी संबोधने आपसूक निर्माण झाली. या बहुतेक मुलांचे वय असे की, जन्मल्यापासून त्यांनी सदैव अस्थिरता आणि युद्ध अशी परिस्थितीच अनुभवलेली असल्यामुळे सुबत्ता जाऊ दे; खाऊन-पिऊन सुखी असणे म्हणजे काय असते हेही त्यांना माहीत नसते! मांसाहार म्हटले तरी प्राण्याचे अमुक अमुक अवयवदेखील खाण्यासाठी असतात, हे त्यांना तोपर्यंत कळलेलेच नसते. कारण मेजवानी म्हटले तरी किमान ते माहीत तरी असायला हवे ना! दक्षिणेत घरातली गरज म्हणून या लहान मुलांना कामाला जुंपलेले असायचे. जे काही छोटे-मोठे काम असेल, त्यातून दोन पैसे तरी घरी येतील अशी अपेक्षा. उत्तरेतल्या मुलांचे आयुष्य त्यामानाने सुखी. ही मुले तिकडे गेल्यानंतर त्यांना वाद्य वाजवणे, शाळेत जाणे, नियमित खेळ खेळणे अशा 'भलत्याच' जगाला सामोरे जावे लागते. मुलांना खऱ्या अर्थाने लहानपण जगण्याची संधी मिळते.

उत्तरेतील आईकडे राहण्याचा कालावधी संपला, की ही मुले दक्षिणेतल्या म्हणजे मूळ आईकडे परतत. उत्तरेतले पालक त्यांना पत्र लिहीत, काही भेटवस्तू पाठवत. 'देव देतो सद्गुणी बालकांना, काय म्हणुनी आम्हांस करंट्यांना?' असा भाव काही आयांच्या मनात उमटत नसला तरच नवल. या बहुतेक आयांची एकमेकींशी कधी भेट झाली नाही.

अन्य प्रांतांमधून आलेल्यांना आश्रय देण्याच्या घटना आपल्याकडे घडल्या नाहीत असे नाही. पोलंडमधून आलेल्या ज्यू कुटुंबांना जामनगर आणि साताऱ्याजवळ आश्रय देण्यात आला होता. पानशेतच्या पुरामुळे शाळा बंद झाल्यावर काही मुलांची सोय कराड-सातारा भागात करण्यात आली होती. काश्मीर खोऱ्यात अशांतता निर्माण झाल्यावर तेथील मुलांच्या शिक्षणाची सोय देशाच्या काही भागांमध्ये करणाऱ्या स्वयंसेवी संस्था परिचयाच्या आहेत. रा. स्व. संघाच्या माध्यमातून ईशान्येतील राज्यांमधील मुला-मुलींच्या शिक्षणाची सोय जेव्हा महाराष्ट्र-कर्नाटकात केली जाते, तेव्हा त्यांचे भविष्य उज्ज्वल होण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात वाढते. अशा मुला-मुलींचे वय पाहता त्यांचे पालकत्व पत्करणे हे अतिशय जबाबदारीचे व प्रसंगी जोखमीचे असू शकते. अशी आणखी कोणती उदाहरणे दिसतात?

Il Treno dei Bambini (The Children's Train) हा या घटनांवर आधारित अतिशय सुंदर इटालियन चित्रपट नेटफ्लिक्सवर आला आहे. मानवी इतिहासातले हे सुंदर प्रकरण मागच्या वर्षी क्रिस्तिना कोमेंचेनी यांनी पडद्यावर आणले. संवाद इटालियन व इंग्रजीत अशा दोन्ही भाषांमध्ये ऐकण्याची सोय आहे. इटालियनमधील पल्लेदार हेल इंग्रजीमध्ये पार हरवून जातो. सुरुवातीला घर सोडून जाणाऱ्या मुलांच्या चेहऱ्यावरील भाव आणि ती घरी परततानाची त्यांची मनस्थिती यातील फरक न समजणारा निव्वळ दगडच म्हणायचा. तर युद्धानंतर उद्भवलेल्या दारिद्र्याच्या पार्श्वभूमीवर हे आनंदाचे मळे पाहणे फारच आनंददायक ठरते. 'एखाद्याला आपल्यापासून दूर जाऊ देणे, हे त्याला आपल्याबरोबर ठेवण्यामागच्या प्रेमापेक्षा अधिक प्रेमाचे असते!', अशा अर्थाचे वाक्य चित्रपटात आहे. विविध कारणांनी आपल्या पोटचे गोळे परगावी पाठवावे लागणारे आईबाप त्यानंतर आयुष्यभर हेच तर अनुभवत असतात की! मग ते सुखवस्तु घरातील असोत की गरजू. अर्थात या चित्रपटातली या वाक्याची पार्श्वभूमी अतिशय गंभीर.

आनंद देणारा हा चित्रपट जरूर पहा.

**– राजेश कुलकर्णी**
ज्येष्ठ लेखक, पुणे

●●●

# पुस्तक परीक्षण : अभिराम भडकमकर यांचे, 'आभाळाचे तुकडे'

*सिद्धहस्त लेखक, नाटककार, दिग्दर्शक, कलावंत म्हणून सुपरिचीत असलेले श्री अभिराम भडकमकर यांनी लिहिलेला 'आभाळाचे तुकडे' हा ललित लेख संग्रह नुकताच प्रकाशित झाला. या पुस्तकावर प्रकाश टाकणारा साहित्य अकादमचे सदस्य व लेखक प्राध्यापक डॉक्टर नरेंद्र पाठक यांचा लेख - संपादक*

अभिराम भडकमकर सिद्धहस्त लेखक, नाटककार, दिग्दर्शक, कलावंत म्हणून आपणास सुपरिचीत आहेत. अलीकडेच त्यांचा 'आभाळाचे तुकडे' हा ललित लेख संग्रह प्रकाशित झाला आहे. गेल्या ३०-३५ वर्षांत अभिराम भडकमकर यांना त्यांच्या अवतीभवती भेटत गेलेली माणसं, समाज व्यवस्था, घडत गेलेल्या घटना, सांस्कृतिक-राजकीय परिस्थिती, त्या त्या वेळी आलेले अनुभव, अशा विस्तीर्ण आभाळाचा म्हणजेच अनुभवांचा अन् आठवणींचा हा निवडक पट आहे. पूर्वी हे लेख विविध वर्तमानपत्रांतून प्रसिद्धही झालेले आहेत. त्या वेळी वाचकांनी भरभरून अभिप्रायही दिलेले आहेत. त्यांनी लिहिलेल्या अनेक लेखांमधून वेचक-वेधक अशा काही निवडक ललित लेखांचा संग्रह म्हणजे 'आभाळाचे तुकडे'. आजही हे सगळे लेख ताजेटवटवीत आणि कालसुसंगत वाटतात. सर्व लेख पुन्हा पुन्हा वाचावेसे वाटतात.

या पुस्तकातील 'नारायण, नारायण' हा पहिलाच लेख वाचकांच्या मनाची पकड घेतो आणि पुढे संपूर्ण पुस्तक एकहाती वाचून पूर्ण होतं. या लेखातील पु. ल. देशपांडे यांचा 'नारायण' आणि 'नारायण द ज्युनिअर' जो आजच्या पिढीतील नारायणाचे प्रतिनिधित्व करतो अशा दोन्ही नारायण या व्यक्तिरेखांची अभिराम यांनी अगदी खुसखुशीत, विनोदी शैलीत मांडणी केली आहे. पाऊस हा विषय तसा नेहमीचाच. अनेक लेखक, कवी यांनी पावसाबद्दल भरभरून लिहिलंय, मात्र पावसाळ्यातील त्यांच्या मित्राचा भावनिक प्रसंग वाचताना क्षणभर आपणही स्तब्ध होतो. मुसळधार पावसात त्यांच्या नाटककार मित्राच्या घरातील सगळंच वाहून जातं. टीव्ही, फ्रीज, कपाट, कपडे, कम्प्युटर.... या भौतिक वस्तूं बरोबर त्या मित्राने लिहिलेली नाटकांची हस्तलिखितं, मित्राला मिळालेली प्रशस्तीपत्रे, वर्तमान पत्रात आलेली परीक्षणं, नाटकांचे फोटो, असंख्य वाचकांची पत्र, हे सगळं वाहून गेल्याचा प्रसंग वाचताना मन सुन्न होतं. मनात अनेक प्रश्न निर्माण होतात. निसर्गाच्या पुढे आपण कोण ? क्षणात होत्याचं नव्हतं होतं. अशा स्थितीतही खचून न गेलेला मित्र वाचकांना सहज सांगून जातो. नाव, पैसा, प्रसिद्धी, सगळ्यांचा शेवट होतो. अखेर आपलंसं आपल्याजवळ उरतं ते हेच ना रे? रसिकांचे प्रेम! शाश्वत आणि अशाश्वततेचा लंबक आपल्या डोळ्यांपुढे हलत राहतो आणि वाचकांच्या डोळ्यांतूनही नकळत पाऊसधारा वाहू लागतात.

या पुस्तकातील काही लेख खास तरुण पिढीसाठी आहेत. आताच्या तरुण पिढीला मोठं होण्याची घाई झाली आहे. त्यासाठी यशप्राप्तीचे शॉर्टकट ते शोधत असतात. अशा तरुण पिढीला तपस्या, संघर्ष, सहनशीलता, तपश्चर्या म्हणजे काय? हे समजून घ्यायचं असेल तर या पुस्तकातील लेखांचा निश्चित उपयोग होईल. 'पहिलं वहिलं' हा लेख म्हणजे अभिराम यांच्या पहिल्या सिनेमाच्या यशाची खडतर कथाच आहे. प्रतिभा, कर्तृत्व, प्रयत्न, कष्ट सारं काही गाठीशी असून सुद्धा 'यश कशी हुलकावणी देतं आणि नियती कसा डाव टाकत असते' हे वाचत असताना लेखकाची जिद्द,

संघर्ष हा प्रवास आपल्या डोळ्यांसमोर एखाद्या शब्दचित्राप्रमाणे उलगडत जातो. 'माणसांचंच नव्हे तर कलाकृतीचंही नशीब असतं. कष्ट करणं आपल्या हातात आहे. ते प्रामाणिकपणे करावे. पुढचं काहीही आपल्या हातात नसतं.नियती मात्र मनात हसत होती. तिने एक भयानक पत्ता टाकायचं ठरवूनही ठेवलं होतं. आम्ही मात्र नियतीच्या या निष्ठूर चाली बाबत अनभिज्ञ होतो. आपण नियतीच्या पटावरच्या सोंगट्या आहोत.' अशी वाक्य वाचकांच्या मनाचा वेध घेतात. छोट्या छोट्या प्रसंगांतून जीवनाचं सत्य सांगून जातात.

नृत्य, नाटक, या क्षेत्रांत नमस्काराचे एक महत्त्व आहे. कृतज्ञतादर्शक एक प्रामाणिक नम्रभाव त्या मागे असतो. लेखक स्वतः नाट्यकर्मी असल्याने नमस्कारचं मोल काय असतं हे त्यांना माहीत आहे. त्यांनी एका मोठ्या व्यक्तीला अशाच कृतज्ञतेच्या जाणिवेने, श्रद्धेने केलेला नमस्कार नंतर त्यांना समोरच्या मान्यवर व्यक्तिकडून आलेला चमत्कारिक अनुभव आपल्याला चक्रावून टाकतो. या अनपेक्षित अनुभवातूनच 'नमस्कार' हा लेख लिहिला गेलेला आहे. नमस्कार, चमत्काराबद्दल लिहीत असताना लेखकाने हरिशंकर परसाई यांचा सांगितलेला किस्साही गंमतीशीर आहे. अभिराम भडकमकर एन.एस.डी.चे विद्यार्थी असताना त्यांना रशियन नाटककार अँटोन चेखोव्हच्या 'सिगल' या नाटकातील त्रेपलेव हे पात्र साकारताना आलेला अनुभव, अनुभवातून मिळत गेलेले शिक्षण, हे सगळंच आपल्याला अनुकरणीय आहे. विशेषतः युवा पिढीसाठी हा लेख म्हणजे नाट्यप्रशिक्षणाचा एक वस्तुपाठच आहे. अशाच प्रकारे एन.एस.डी मधील लेखकांचे नाट्यगुरू जर्मनीचे ख्यातनाम दिग्दर्शक फ्रीट्झ बेनेवोट्झ यांच्या अध्यापन शैलीवरील भाष्य, गुरू-शिष्य नातं, त्यांच्यामधील संवाद, विद्यार्थ्यांसाठी समर्पित असलेले गुरू आणि गुरूच्या चरणी श्रद्धा, विश्वास वाहिलेले अनेक विद्यार्थी. हे सगळं वाचताना मन भारावून जातं. भारत असो की जर्मनी, शिक्षणाबद्दल, कर्तव्याबद्दल निष्ठा असली की गुरू-शिष्याचं नातं बहरत जातं, या गुरू-शिष्य नात्याचा अनुभव भडकमकर यांना नाट्य शिक्षण घेत असताना एन.एस.डी.मध्ये मिळाला.

महाराष्ट्राचे लाडके लेखक पु.ल.देशपांडे यांच्या घरी दरोडा घालायला गेलेल्या दरोडेखोरां संबंधीचा लेख 'भाईंच्या घरी भाईचा दरोडा' हा लेख खुसखुशीत तर आहेच; पण त्या दरोडेखोरात परिवर्तन करणारा, सुख, समाधान याची प्रचिती देणारा असा आनंददायी अनुभव आहे. 'सांगावा डॉट कॉम' मधील जुन्या काळातील पत्रं, पोस्टमन, त्यातील गतकातरता आणि आता इमेल पर्यंत पोहोचलेला प्रवास, झालेली प्रगती, ही नव्या-जुन्याची सांगड घालताना भावना आणि प्रगतीच्या वाटा याचा समतोल साधलेला आहे. या पुस्तकातील लेख वाचत असताना काही क्षण आपणही त्या, त्या प्रसंगाशी एकरूप होतो. त्या, त्या पात्रांचा एक भाग होऊन जातो. अगदी ओघवत्या शैलीत सर्व लेख लिहिलेले आहेत.

सृजनाची झिंग काय असते याचं उत्तम उदाहरण म्हणजे अभिराम यांच्या 'देहभान' नाटकाची कथा. त्यांचा अनुभव. समाजात संवेदनशील असलेल्या शरीर संबंधांसारख्या विषयाला नैतिकता आणि अनैतिकतेच्या पलीकडे जाऊन माणूसपणाचं भान उत्पन्न करणारं हे नाटक वाचकांना उलगडत जातं. एक वेगळा विषय धाडसानं रंगभूमीवर आणण्याचा भडकमकर यांचा प्रयत्न आणि नाटकाच्या प्रयोगांतून मिळणारे अनुभव हे सगळं वाचताना त्यांच्या चिंतनशीलतेचा प्रत्यय आपल्याला येतो. महायुद्ध असो, भूकंप असो, जलप्रलय असो, की कोरोना असो, आपलं राष्ट्र या सगळ्या आपत्तींमधून


(पृष्ठ क्र. १४ वर)

# होशवालोंको ख़बर क्या ...

*८ फेब्रुवारी म्हणजे प्रसिद्ध गझल गायक जगजीत सिंग यांचा जन्मदिवस आणि प्रसिद्ध शायर निदा फाजली यांचा मृत्यूदिन. विलक्षण योगायोग. निदा फाजली यांच्यावर वसुंधरा काशीकर यांनी लिहिलेला लेख*

*– संपादक*

८ फेब्रुवारीची सकाळ मोठी प्रसन्न होती. सकाळपासूनच वेगवेगळ्या माध्यमांतून दिवंगत ज्येष्ठ गझल गायक जगजीत सिंग यांचा जन्मदिवस साजरा करणं सुरू झालं होतं. जगजीतजींचे अत्यंत आवडते शायर निदा फाजलींना आता या आठवड्यात जाऊन भेटायचंच असं मी मनात ठरवलं. अन् दुपार आली ती अत्यंत उदास, विषण्ण आणि जग निरर्थक आहे असं वाटायला लावणारा निरोप घेऊन. निदा फाजली गेले होते. आयुष्यभर केवळ लेखन आणि 'लेखन हेच व्रत' घेऊन जगलेला एक 'इमानी' शायर म्हणेज निदा फाजली. 'चरितार्था'साठी दुसरी कोणतीही गोष्ट त्यांनी कधीच केली नाही. 'तडजोड' हा शब्द निदा फाजलींच्या शब्दकोशात नव्हताच. त्यासाठी प्रचंड किंमतही त्यांनी चुकवली. ही किंमत त्यांच्या सगळ्या साहित्यांतून आपल्याला चमकताना दिसते. आणि म्हणूनच 'ये जिंदगी है, हिसाबों से जी नही जाती'...असे लिहिण्याचा हक्क फक्त निदांनाच मिळतो.



निदांच्या आयुष्यात ही तडजोड नाकारण्याची सुरुवात फाळणीपासूनच झाली. फाळणी झाली त्यावेळी निदांचं अख्ख कुटूंब पाकिस्तानात गेलं. पण निदांनी जायला नकार दिला. धर्म, पंथ, भाषा, देश हे मानवता आणि माणसापेक्षा कसे मोठे असू शकतात? निदांच्या आयुष्यात प्रश्न विचारण्याची सुरुवात इथून झाली. एकदा मी आणि माझा भाऊ निदांशी गप्पा मारत असताना निदा म्हणाले, 'लेखक, कवी, शायर इन्होने सवाल पुछने चाहिये. व्यवस्थेला प्रश्न विचारणं ही साहित्यिकांची जबाबदारी आहे. 'इंटलेक्चुअल कॅपिटलिस्ट' होऊन श्रीमंत होण्याचा मार्ग निदांना फारच सोपा होता. पण निदांनी आपलं इमान कधी विकलं नाही. मग –

'बच्चा बोला देखकर, मस्जिद आलिशान,
अल्लाह तेरे एक को, इतना बडा मकान?'

असं विषमतेविरुद्ध थेट अल्लाहला जाब विचारण्याचं धैर्य निदांनी दाखवलं आणि हे धैर्य त्यांच्या जगण्यातून आलं होतं. व्यवस्थेला प्रश्न विचारणारा हा शायर होता. व्यवस्थेमधला धर्माचा किफायतशीर बाजार त्यांना दिसतो आणि त्याचवेळी कुलीच्या डोक्यावरचं अमानुष ओझं त्यांना बोचतं. मग निदा म्हणतात, –

ईसा, अल्लाह, ईश्वर, सारे मंतर सीख।
जाने कब किस नाम से मिले जियादा भीख।

स्टेशन पर खत्म की भारत तेरी खोज।
नेहरू ने लिख्खा नही, कुली तेरा बोझ।

ओशोंनी एके ठिकाणी म्हटलं आहे की, वेदना या शब्दाची व्युत्पत्ती 'विद्' या धातूपासून होते. 'विद्' चा अर्थ आहे 'जाणणे'. ही जाणीवसंपन्नता आणि भावसंपन्नता वेदनेने निदांना दिली होती. फाळणीच्या वेदनेने त्यांचं काळीज पिळवटून निघालं, एका गझलेत ते म्हणतात, -

पेहले हर चीज थी अपनी, मगर अब लगता है।
अपने ही घर में किसी दूसरे घर के हम है।

आपल्याच घरात राहताना परकेपणाची,उपरेपणाची भावना यावी. काय दु:ख आहे आणि त्या दु:खाची काय ताकदीची अभिव्यक्ती आहे. निदांना या दु:खाने अक्षरश: सोलवटून काढलं, पण कडवट नाही बनवलं. दु:ख भोगण्याचाही एक दंभ असतो, तो निदांमध्ये कधीच आला नाही. उलट त्यांच्यातल्या कलंदर, फकीरी वृत्तीला त्याने पोषण दिलं. वेदनेने त्यांच्या जीवनाचा विस्तार केला. अन् ते मानवतेचे पहारेकरी बनले आणि सद्सद्विवेकबुद्धीचे कैदी झाले. दु:ख विकण्याचा नफ्याचा धंदा निदांनी कधीच केला नाही. प्रेम हे त्यांच्या जीवनाचे सार झाले. निदा म्हणतात, -

चाहे गीता बांचिये, या पढिये कुरआन।
तेरा मेरा प्यार ही हर पुस्तक का ज्ञान ।

निदांचं हे प्रेम बुद्धाच्या जातकुळीचं होतं असं म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही. या प्रेमाने निदांना धर्मातीत केलं. जात, धर्म वैचारिक पातळीवर नाकारणं तसं सोपं आहे; पण प्रत्यक्ष जगताना ते किती लोकांना नाकारता येतं? निदांना ते साधलं होतं. निदांच्या सगळ्या शायरीत जसा मानवतावाद आहे, तसाच आशावादही आहे. जग हे सर्वत्र वाईटाने भरलेले आहे असा सतत नकारात्मक सूर लावणाऱ्या लोकांना निदा सांगतात,-

जितनी बुरी कही जाती है, उतनी बुरी नही हैं दुनिया।
बच्चो कें स्कुलों शायद, तुमसे मिली नही है दुनिया।

सहजता आणि सोपेपणा हा निदांच्या लिखाणाचा आत्मा होता. पण त्याचवेळी त्यांच्या लिखाणात अत्यंत खोल असं तत्त्वज्ञानही होतं. सोपेपणा आणि खोली एकाचवेळी साधणं दुर्मीळच. त्यांचे दोहे हे त्याचं सुरेख उदाहरण आहे.

पूजा घर में मूरती , मीरा के संग श्याम।
जिसकी जितनी चाकरी, उतने उसके दाम। किंवा
दो और दो का जोड हमेशा, चार कहाँ होता है।
सोच समझ वालों को थोडी, नादानी दे मौला।

गालिब, मीर, कबीर, सूरदास, मीरा अशांच्या प्रभाव परंपरेचा वारसा चालवणारी त्यांची शायरी होती. निदांना भेटल्यावर कायम जाणवणारी एक गोष्ट म्हणजे त्यांच्यातला इनोसन्स. निदा म्हणजे अगदी लहान मूल होते. बरं याचा अर्थ त्यांना बनेलपणा, बदमाषी समजत नव्हती का, तर असंही नाही. लोकांचा व्यवहार, उपयोगितावाद किंवा बनेलपणा त्यांना नीट कळत असे, पण त्यावर कधी निदांना प्रतिक्रिया देताना बघितले नाही. हे सगळं समजूनही त्यांच्यातलं लहान मूल कसं कायम राहीलं हे मला कोडच वाटतं.

जीवनाच्या या कशमकशमध्ये, स्वत्व टिकवून ठेवण्याचं आव्हान पेलत असताना निदांमधला रोमँटिक शायर, सौंदर्याचा कदरदान कुठेही सुकला नाही. भारतीय सिनेजगताला आणि प्रेमात असलेल्या सर्वांनाच निदांनी काही अप्रतीम गाणी, गझला दिल्या आहेत. 'होंश वालोंको खबर क्या, बेखुदी क्या चीज है।' ही सरफरोश सिनेमामधली जगजीत सिंग यांनी गायलेली गझल त्यातली माईलस्टोन आहे.

निदा हे केवळ शायर नव्हते तर ते विचारवंत शायर होते. मानवी जीवनातील, व्यवस्थेतील प्रश्नांचा शोध घेणारे आणि त्यावर उपाय शोधू पाहणारे विचारवंत. ज्यावेळी माझ्या मोठ्या भावाच्या 'अंतर्नाद' या कवितासंग्रहाचं प्रकाशन त्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी बोलता बोलता त्यांनी एक महत्त्वाचा विचार मांडला. ते म्हणाले की, धर्मापेक्षाही संस्कृती मोठी असते. धर्माच्या आधारावरचा द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत बांगलादेशाच्या निर्मितीने खोटा ठरवला आहे. कारण तसं असतं तर मग बांगलादेश निर्माणच झाला नसता. म्हणून संस्कृती ही मोठी आहे. कारण संस्कृतीमध्ये भावना आहेत. अमृता प्रीतम यांच्या ओळी त्यांनी त्यांच्या विचाराचं गृहितक सिद्ध करण्यासाठी उदाहरणादाखल सांगितल्या.

माँओं के चेहरों की जगमगाहट,
बेहनों के चुडियों की खनखनाहट,
प्रेयसी के दुपट्टे की सरसराहट और
समय की आहट सभी जगह एक जैसी होती है...

यातून निदा प्रश्नांचा किती मूलगामी विचार करायचे हे दिसतं. निदांची शायरी माणसाला थांबवून आत्मपरिक्षण करायला लावते. त्याला उन्नत करते, स्वच्छ करते आणि इन्सान बनण्याच्या प्रवासात मदत करते आणि म्हणूनच जगात थैमान घालणाऱ्या मूलतत्त्ववाद आणि दहशतवादाच्या पार्श्वभूमीवर निदांची शायरी ही मला मानवतेचा सेतू बांधणारं आश्वासन वाटतं !

**– वसुंधरा काशीकर**
मुक्त पत्रकार, लेखक व निवेदक

•••

(पृष्ठ क्र.११ वरून – **पुस्तक परीक्षण : अभिराम भडकमकर यांचे 'आभाळाचे तुकडे'**)

कसं टिकून राहतं ? या राष्ट्राची ताकद काय आहे ? याबद्दलचं चिंतन म्हणजे , 'आहे मुळीचाच झरा..' हा लेख. भारतातील लोकांची विजिगीषुवृत्ती आणि राष्ट्राची सौम्यशक्ती हे वाचताना खूप आश्वासक वाटतं आणि अभिमानाने ऊर भरून येतो. पालकांचं अपेक्षांचं ओझं, मुलावरील ताण, विद्यार्थ्यांच्या क्षमतांचा शोध घेणारे शिक्षक, साहित्य-कलाक्षेत्रातील अभिव्यक्ती स्वातंत्र्य, साहित्यिकांचा बेगडीपणा, राजकारण, राजकीय नेत्यांच्या पर्यायाने ठरावीक विचारधारेला शरण जाणारे साहित्यिक, कलावंत, या सगळ्यांत माझा देश शोधणारे प्रामाणिक नागरिक, लेखक, कलाकार, तसेच विदेशी पर्यटनांतून मिळणारी सजग दृष्टी, अशा विविध विषयांवर मार्मिक भाष्य करणारे लेख वाचकांना समृद्ध करतात.

मुळातच अभिराम भडकमकर यांच्या भाषेची श्रीमंती, भाषेचा पोत, लिहिण्याची ओघवती कथात्मक शैली, ठिकठिकाणी मनाचा वेध घेणारी चिंतनशील वाक्यं, आणि लेखनातील सहजता यामुळे हा ललित लेखसंग्रह पुन्हा पुन्हा वाचत राहावा असे वाटते. अर्थात अभिराम भडकमकर यांच्या आधीच्या कादंबऱ्या आणि नाटकांच्या बाबतही असाच प्रत्यय वाचकांना यापूर्वीही आलेला आहेच. 'आभाळाचे तुकडे' म्हणजे अभिजात भाषा आणि वाचन समृद्धीचा पुनःप्रत्यय.

**– डॉ. नरेंद्र पाठक**
सदस्य, साहित्य अकादमी, दिल्ली
ठाणे
भ्रमणध्वनी : ९१६७४०६०५०

•••

# परिसर वार्ता

**– संकलित**

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी पूर्व प्राथमिक विभाग

**दिवाळीची सुट्टी संपून ६ नोव्हेंबरला दुसऱ्या सत्राची सुरुवात झाली. दुसऱ्या सत्रातील विविध उपक्रमांचा आढावा –**

**वेशभूषा दिवस –**

१४ नोव्हेंबरला साजरा करण्यात येणारा बालदिन त्याचेच औचित्य साधून वेशभूषा दिवसाचे आयोजन १४ नोव्हेंबर २०२५ रोजी करण्यात आले होते.



**नर्सरी व ज्यूनियर – कोणतीही आरामदायक वेशभूषा**

सिनियर : १) आवडता खेळाडू २) आवडते कार्टून ३) आपले सहकारी असे विषय देण्यात आले होते.

पालकांनी मुलांकडून चांगली करून घेतलेली तयारी मुलांच्या सादरीकरणातून दिसून आली. याच दिवशी पालकांना प्रथम निरिक्षणाचे प्रगती पुस्तक देण्यात आले.

**वार्षिक स्नेहसंमेलन –**

१८ – माध्यमिक विभाग

१९ – प्राथमिक विभाग

२० – पूर्व प्राथमिक विभागाचे स्नेहसंमेलन पार पडले.

मराठी, इंग्रजी, हिंदी अशा विविध भाषांतील गाण्यावर मुलांनी नृत्य सादर केली. संत ज्ञानेश्वर माउली हे नाटुकले सिनीयर के. जी. च्या मुलांनी सादर केले. सर्व प्रेक्षकांनी, पालकांनी, तसेच शिक्षकवर्गाने आमच्या बालकलाकारांचे कौतुक केले.

**२१ डिसेंबर – रविवार – सांस्कृतिक कलादर्पण आंतरशालेय नाट्य/नृत्य**

गेली १२ वर्षं या स्पर्धेत शाळा भाग घेत आहे व सातत्याने बक्षिसेही मिळवत आहे.

यावर्षी 'वाघ्या मुरळी नृत्य' व 'संत ज्ञानेश्वर माउली' या नाटुकल्याच्या सादरीकरणाने या स्पर्धेत भाग घेतला होता.

१) सर्वोत्कृष्ट नृत्य – द्वितीय क्रमांक

२) सर्वोकृष्ट नृत्य दिग्दर्शक – प्रथम क्रमांक – सौ. प्रीती कुळकर्णी

३) सर्वोकृष्ट नाटक – प्रथम क्रमांक

४) सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक – सौ. योगिता नाईक

५) सर्वोत्कृष्ट शाळा – फिरती ढाल व सन्मानचिन्ह



**सोमवार २२ डिसेंबर – नाताळ**

लाल पांढऱ्या रंगाचे कपडे परिधान केलेले आमचे चिमुकले सांताक्लॉजची वाट पाहात होते. सर्वांनी नाताळच्या गाण्यावर नृत्य केले. सायकलवरून बेल वाजवत हातात फुगे, काठी घेऊन सांताक्लॉज आला, मुलांबरोबर नाचत गात सर्वांनी आनंद लुटला.

नर्सरी व ज्यूनियरसाठी मँगो ग्रुपची तर सिनीयर के.जी. साठी एक ग्रुपची कु. रुत्वी सांताक्लॉज झाली होती. केक व वेफर्सचा खाऊ मुलांना यानिमित्त देण्यात आला.

नर्सरी – वेळ १० ते ११

ज्युनियर – १०.३० ते ११.४५ – ख्रिसमस ट्री चे चित्र रंगवणे

सिनीयर – १.३० ते ३.०० – चित्रकला वहीत नाताळचे चित्र काढणे.

**क्रीडा दिन – २३ व २४ डिसेंबर २०२६**

२३ डिसेंबर – नर्सरी – सकाळी १० ते ११.३० वा ठिकाण – शाळेतील टर्फ

नर्सरी – धावणे / दोन मुलांच्या जोडीने मोठा बॉल बॅलन्स करून चालणे.

सर्व मुलांना चित्र रंगवण्यासाठीची पुस्तके बक्षीस म्हणून देण्यात आली.

ज्युनियर – वेळ – ११.३० ते १.००

१) धावणे २) उपड्या घातलेल्या बाऊलमधील ठोकळा बाऊलमध्ये घालून धावणे.

सर्व मुलांना विविध चित्रे असलेली पुस्तके बक्षीस म्हणून दिली गेली.

२४ डिसेंबर २०२६ – सिनीयर केजी – ठाणा कॉलेज

१) धावणे २) अडथळ्यांची शर्यत ३) सुईत मणी ओवून धावणे अशा स्पर्धा घेण्यात आल्या. सर्वांना दोरीवरच्या उड्या बक्षीस म्हणून दिल्या.

सर्व शर्यतीतील पहिल्या तीन विजेत्यांना प्रशस्ती पत्रके देण्यात आली.

१) दैनंदिन जीवनात उपयोगी पडणाऱ्या

२) मुलांच्या स्नायू विकासासाठी

३) स्वावलंबी बनवण्यासाठी

असे तीनही उद्देश साध्य करण्यासाठी विविध उपक्रम घेतले जातात.

**जानेवारी – नर्सरी – संत्र सोलणे व खाणे**

**जानेवारी – ज्यूनियर व सिनीयर – मटार सोलणे या गोष्टी घेतल्या गेल्या.**

**१२ जानेवारी – नर्सरी व ज्यूनियर – शो ॲन्ड टेल**

मुलांनी एखादी वस्तू / चित्र/खेळणं हातात धरून त्याविषयी ३/४ ओळी इंग्रजीतून बोलणे असा उपक्रम घेतला गेला.



**सिनीयर के.जी. –** १) माझा आवडता खाद्यपदार्थ
२) माझे आवडते प्रेक्षणीय स्थळ

असे विषय दिले होते. यावर ५/६ वाक्य इंग्रजीतून बोलणे असा उपक्रम घेतला गेला.

**१६ जानेवारी २०२६ – संक्रांत**

या दिवशी मुलांनी काळे कपडे घातले होते. संक्रांत विविध प्रांतात कशी साजरी होते, त्याचे महत्त्व

A.V. च्या माध्यमातून मुलांना सांगण्यात आले. तिळगुळाचा खाऊ देऊन सर्वांनी 'तिळगुळ घ्या गोड गोड बोला' म्हणत एकमेकांना संक्रांतीच्या शुभेच्छा दिल्या.



नर्सरी – पतंगाचे स्टेन्सिल रंगवणे.

ज्यूनियर – चित्रकला वहीत कागदाचा पतंग चिकटवून त्याला दोरी काढणे.

सिनियर – विविध रंग व आकाराच्या पतंगांची चित्रकला वहीत चित्र काढणे.

**१७ जानेवारी – शाळेत मुक्काम – सिनियर के.जी.**



दुसऱ्या सत्रात या उपक्रमाची सिनीयरची मुलं खूप उत्सुकतेने वाट पहात असतात. शनिवार १७ जानेवारी संध्याकाळी ७ वाजता आपल्या छोट्या/मोठ्या बॅगा सांभाळत मुलं शाळेत आली. सामान ठेवून 'मस्ती की पाठशाला' सुरू झाली. नंतर सर्व मुलांचे खेळ घेण्यात आले. काही मुलांनी नृत्य व गाणे याचे सादरीकरण केले.

हात, पाय स्वच्छ धुऊन आपापल्या पाण्याच्या बाटल्या घेऊन जेवणासाठी मुलं तयार झाली. पुरी, बटाट्याची भाजी व श्रीखंड असा आवडीचा मेनू. मुलं छान जेवली. शाळेच्या आवारात शेकोटीचा कार्यक्रम. त्याभोवती गाणी गायली.

पुन्हा एकदा हात-पाय धुऊन रात्रीचे कपडे घालून शिक्षकांच्या मदतीने अंथरूणे घालून आपापल्या मित्र-मैत्रिणीं शेजारी मुलं झोपली. रविवारी १८ जानेवारीला सकाळी ७ वाजता ब्रश करून बॅगा सावरत मुलं पालकांसोबत घरी गेली.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

**मकर संक्रांती – "तिळगुळ घ्या, गोडगोड बोला"**

१३ जानेवारी या दिवशी ए.के. जोशी प्राथमिक विभागाच्या इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी मकर संक्रांत साजरी केली. मकर संक्रांतीची माहिती, तसेच सूर्याचा मकर राशीमध्ये होणारा प्रवेश याबद्दलची माहिती सांगण्यात आली व वेगवेगळी गाणी गाण्यात आली. विद्यार्थ्यांच्या कलात्मक गुणांना वाव देण्यासाठी विविध उपक्रम राबवण्यात आले. अशा प्रकारे मकर संक्रांत आनंदात साजरी करण्यात आली.





**आंतरराष्ट्रीय स्पेल बी दुसऱ्या स्तराचा निकाल २०२५-२०२६**

स्पेल बी लेव्हल – २ स्पर्धा परीक्षेमध्ये २०२५-२६ मध्ये भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांचे निकाल जाहीर करत आहोत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन!

अचिव्हमेंट कॅटेगरी मध्ये एक टॉपर आहे.

डिस्टिंक्शन कॅटेगरी मध्ये ७ विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र दिले जाईल.



**अचिव्हमेंट कॅटेगरी - प्रादेशिक/राज्य स्तर**

| क्र. | विद्यार्थी नाव | वर्ग | मिळालेले अंक |
|---|---|---|---|
| १ | कु. खांचे इझान हरीस | १ | ९७ |

**डिस्टिंक्शन कॅटेगरी**

| क्र. | विद्यार्थी नाव | वर्ग | मिळालेले अंक |
|---|---|---|---|
| १ | कु. झगडे यथार्थ धीरज | १ली | ८३.५ |
| २ | कु. शाह ग्रीवा हर्दिक | १ली | ७५ |
| ३ | कु. छेडा तत्त्व दिनेश | १ली | ७५ |
| ४ | कु. वर्तक प्रथमेश पुष्कराज | २री | ८३ |
| ५ | कु. पाशते मीरा प्रितम | २री | ८१ |
| ६ | कु. वीरकर स्वरंग निनाद | ३री | ७७ |
| ७ | कु. शितुत महेक मंदार | ४थी | ८० |

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यमिक विभाग

ठाण्याच्या व्ही.पी.एम. संस्थेच्या शाळांचा प्रजासत्ताक दिन संयुक्तपणे साजरा!




व्ही.पी.एम. संस्थेच्या सौ. ए. के. जोशी इंग्लिश मीडियम स्कूल आणि डॉ. बेडेकर विद्या मंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन देशभक्तीच्या भावनेने साजरा केला. या कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून संस्थेच्या ज्येष्ठ सदस्या श्रीमती अल्पना बापट, संस्थेचे वरिष्ठ सदस्य श्री. दिलीप जोशी, आणि दोन्ही शाळांच्या तिन्ही विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

श्रीमती अल्पना बापट यांनी राष्ट्रध्वज फडकावून कार्यक्रमाची सुरुवात केली, त्यानंतर राष्ट्रगीत आणि राज्यगीत गायन झाले, ज्याने संपूर्ण परिसर भारावून गेला.

श्रीमती अल्पना बापट यांनी आपल्या भाषणात १००% साक्षरतेचे महत्त्व, पर्यावरणाची जबाबदारी आणि आपल्या सभोवतालची काळजी घेण्याबद्दल सांगितले.

दोन्ही शाळेच्या विद्यार्थ्यांनी संगीतमय कवायती अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने सादर केल्या. तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांच्या सादरीकरणाने या कार्यक्रमाचा समारोप झाला.





या राष्ट्रीय उत्सवाच्या सुंदर सादरीकरणासाठी शाळांनी सर्व अतिथी, शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

**इंग्रजी माध्यम शाळा आर्ट क्राफ्ट सायन्स प्रदर्शनाने बहरली!**

शनिवार दिनांक ३१ जानेवारी रोजी शाळेत आर्ट, क्राफ्ट आणि सायन्स प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. ज्यामध्ये विद्यार्थ्यांना स्वतःचे कौशल्य, जिज्ञासा आत्मविश्वासाने दाखवण्याची संधी मिळाली.

या कार्यक्रमाला होमी भाभा सेन्टर येथी वैज्ञानिक माननीय श्री. विजय लाळे, शाळेच्या माजी मुख्याध्यापिका माननीय साठे आणि माजी आर्ट क्राफ्ट शिक्षिका माननीय भोळे यांची उपस्थिती लाभली.

मुख्याध्यापिका, डॉ. अस्मिता मोहिले ह्या मान्यवरांना शाळेच्या प्रदर्शनाच्या विविध दालनांत घेऊन गेल्या.

माननीय साठे यांनी सायन्स प्रदर्शनाचे उद्‌घाटन केले. माननीय श्री. विजय लाळे यांनी सायन्स प्रदर्शनातील प्रकल्पांचे परीक्षण केले.




विज्ञान विभागात नावीन्यपूर्ण असे प्रयोग दाखवण्यात आले, जेथे तरुण वैज्ञानिक आत्मविश्वासाने त्यांच्या संकल्पना समजावून सांगत होते.




गार्गी सभागृह येथे मांडण्यात आलेल्या आर्ट-क्राफ्ट प्रदर्शनाचे उद्‌घाटन माननीय भोळे यांनी केले. गार्गी सभागृहाच्या नावाच्या अनुषंगाने महान विदुषी गार्गी यांची सुंदर रांगोळी साकारली होती, विद्यार्थ्यांनी स्व-हस्ताने केलेल्या कलाकृती मांडण्यात आलेल्या होत्या, त्या कलाकृती आणि रांगोळी पाहताना भेट देणाऱ्या सगळ्यांचे भान हरपले होते. संगीत विभागातील प्रतिभावंत विद्यार्थ्यांच्या सुमधुर गायनाने आणि वादनाने वातावरण मंत्रमुग्ध झाले होते.

इतिहास, भूगोल आणि गणित विभागातील प्रदर्शन नावीन्यपूर्ण अशा नमुन्यांनी, कृत्रिम कातळशिल्पांनी, तसेच बुद्धीला चालना देणाऱ्या अनोख्या खेळांनी गजबजून गेले होते आले.

प्रथमच सहभाग घेतलेल्या संस्कृत विभागाकडे सुद्धा भेट देणाऱ्यांची रीघ लागली होती. येथे साकारलेले वंशावळ वृक्ष मुख्य आकर्षण ठरले होते.

ग्रंथालय विभागाचे उद्‌घाटन इयत्ता ९वी मधील स्नेहा पाटील या यंदाच्या बेस्ट रीडरच्या हस्ते श्री ज्ञानेश्वरीला पुष्प अर्पण करून करण्यात आले, या प्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका, पालक प्रतिनिधी सौ. डेलिया परांजपे आणि सौ. श्रेया केळकर उपस्थित होत्या. ग्रंथालयात इंग्लिश, मराठी, संस्कृत, हिंदी या भाषेतील समृद्ध साहित्य मांडण्यात आले होते. विविध विषयांवरील कोष ठेवण्यात आले होते. ग्रंथालयांतील विद्यार्थी प्रतिनिधींनी वाचनाचे महत्त्व, वाचनावरील कविता वाचून दाखविल्या.

स्कॉलॅस्टिक प्रकाशनचे पुस्तक स्टॉल देखील सगळ्यांचे लक्ष वेधून घेत होते, जेथे विविध वयोगटांतील बाल वाचकांसाठी तऱ्हेतऱ्हेची पुस्तके उपलब्ध होती.

संगणक विभाग देखील प्रथमच या प्रदर्शनात सहभागी झाला होता. यात विद्यार्थ्यांनी स्वतःचे कोडिंग कौशल्य आणि स्व-हस्ते तयार केलेले खेळ दाखवून आपल्या बुद्धिचातुर्याची चुणूक दाखवून दिली.

शाळेचा संपूर्ण परिसर अतिशय सुबकरित्या सजवण्यात आला होता. विद्यार्थ्यांच्या, पालकांच्या

उत्साही सहभागाने आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाने प्रदर्शन यशस्वी होण्यात हातभार लागला यात यत्किंचितही शंका नाही!


**भारताचे भविष्य उज्ज्वल करणाऱ्या भावी राष्ट्रनिर्मिती करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिक्षकांचा सन्मान!**

शाळेतील सौ. मनीषा साळी, सौ. नमिता जोशी, सौ. गौरी मोहिले आणि सौ. अनुष्का सरपोतदार यांना 'रोटरी क्लब ऑफ ठाणे डाउनटाउन' या संस्थेने 'नेशन बिल्डर अ‍ॅवॉर्ड' प्रदान केला. हा पुरस्कार शैक्षणिक क्षेत्रातल्या त्यांच्या समर्पणासाठी आणि भविष्यातील जागरूक नागरिकांना आकार देण्याच्या त्यांच्या निःस्वार्थी योगदानाबद्दल देण्यात आला. शाळेच्या व्यवस्थापनाने, मुख्याध्यापिकांनी आणि शिक्षकांनी सदर शिक्षक पुरस्कार विजेत्यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या.



या पुरस्काराने हेच अधोरेखित होते की, ''शिक्षक हे एक मजबूत आणि प्रगतीशील राष्ट्राचे खरे वास्तुविशारद आहेत.''

**शाळेसाठी अभिमानस्पद क्षण!**



आमच्या शाळेसाठी अत्यंत गौरवाचा क्षण म्हणजेच आमच्या मुख्याध्यापिका डॉ. अस्मिता मोहिले यांना दिनांक १९ जानेवारी २०२६ रोजी नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड (NAB) च्या ७५व्या वर्धापन दिनाच्या समारंभासाठी आमंत्रित करण्यात आले होते. NAB या संस्थेला शाळेचे २५ वर्षांहून अधिक काळाहून सहकार्य लाभत आहे.

रिलायन्स फाऊंडेशनच्या चेअरपर्सन मिसेस नीता अंबानी आणि प्रसिद्ध अभिनेता श्री. जॉन अब्राहम यांच्याशी झालेल्या प्रेरणादायी संवादाने हा सोहोळा अधिकच महत्त्वाचा ठरला.



NAB च्या सेवाभावी आणि प्रेरणादायी प्रवासात शाळेचाही सहभाग आहे, ही शाळेसाठी अत्यंत आनंदाची बाब आहे.

## जोशी–बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त)

**महाविद्यालयात 'प्रोफेशनल इंट्रोडक्शन स्किल्स' कार्यशाळेचे आयोजन**

महाविद्यालयात सेल्स अँड मार्केटिंग मॅनेजमेंट विभागामार्फत (BVoc) विद्यार्थ्यांसाठी एका विशेष कौशल्य विकास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'इंट्रोड्यूस लाईक अ प्रोफेशनल' या शीर्षकाखाली शनिवारी, १३ डिसेंबर २०२५ रोजी ही कार्यशाळा पार पडली. व्यावसायिक ठिकाणी आपली ओळख प्रभावीपणे कशी करून द्यावी आणि कामाच्या ठिकाणी पाळावयाचे शिष्टाचार (Workplace Etiquette) यावर या सत्रात प्रामुख्याने भर देण्यात आला.

या उपक्रमात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला, ज्यामध्ये मुलाखती, व्यावसायिक बैठका आणि नेटवर्किंगसाठी आवश्यक असलेल्या 'इंट्रोडक्शन स्क्रिप्ट्स' तयार

करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. प्रथम प्रभाव (First Impression), योग्य भाषेचा वापर आणि व्यावसायिक वागणूक या गोष्टींचे महत्त्व विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकांद्वारे समजावून सांगण्यात आले. या सत्राने विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवण्यासोबतच त्यांच्या संवाद कौशल्याला नवी दिशा दिली. उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, बी.व्होक समन्वयक डॉ. अर्चना प्रभुदेसाई आणि क्टिव्हिटी इन-चार्ज प्रा. गौरी पांडे यांचे मार्गदर्शन लाभले.

महाविद्यालयात सेल्स अँड मार्केटिंग मॅनेजमेंट (BVoc) विभागाद्वारे विद्यार्थ्यांसाठी 'सर्फ स्मार्ट: अंडरस्टँडिंग नेटिकेट्स' या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सोमवार, १२ जानेवारी २०२६ रोजी पार पडलेल्या या सत्रामध्ये डिजिटल जगातील शिष्टाचार म्हणजेच 'नेटिकेट्स'चे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. प्रत्यक्ष जीवनातील डिजिटल संवादा-दरम्यान पाळावयाचे नियम समजून घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी विविध केस स्टडीजचा सखोल अभ्यास केला. या प्रक्रियेत विद्यार्थ्यांनी अयोग्य ऑनलाइन वर्तणूक ओळखून त्यावर प्रभावी उपाय सुचवले आणि इन्फोग्राफिकच्या माध्यमातून माहितीचे सादरीकरण केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सांघिक कार्य, चिकित्सक विचार आणि डिजिटल प्लॅटफॉर्मचा जबाबदार वापर करण्याची वृत्ती विकसित होण्यास मदत झाली. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक आणि बी.व्होक समन्वयक डॉ. अर्चना प्रभुदेसाई यांच्या मार्गदर्शनाखाली हे शैक्षणिक सत्र यशस्वीरित्या पार पडले.

महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाच्या वतीने Transforming Lives: The Power of Collective Service या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. शनिवार, १७ जानेवारी २०२६ रोजी थोरले बाजीराव पेशवे सभागृह येथे पार पडलेल्या या परिषदेला विद्यार्थ्यांचा व शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

सामूहिक सामाजिक सेवेमुळे व्यक्ती आणि समाजात घडणाऱ्या सकारात्मक परिवर्तनाची जाणीव निर्माण करणे हा या परिषदेचा मुख्य हेतू होता. परिषद शैक्षणिक, संवादात्मक आणि प्रेरणादायी स्वरूपाची होती. पद्मश्री चैतराम पवार (अध्यक्ष, देवगिरी कल्याण आश्रम), श्री. राजाराम कटारा (संचालक, झाबुआंचल फार्मर्स प्रोड्युसर कंपनी, मध्यप्रदेश), डॉ. प्रियंवदा टोकेकर (उपप्राचार्या), सौ. वर्षा परचुरे (संचालक, परिवर्तन महिला संस्था), सौ. रमा श्याम (संचालक, स्नेहा फाऊंडेशन), श्री. जीवन विचारे (उपप्राचार्य व NSS जिल्हा समन्वयक - ठाणे), डॉ. देवयानी आवाडे, सौ. स्वर क्रांती, डॉ. विनायक राजे, डॉ. विरोचन रोते आणि डॉ. जयश्री सिंह यांनी आपल्या अनुभवांवर आधारित मार्गदर्शन केले.

मान्यवर वक्त्यांनी समाजसेवेचे महत्त्व, सामूहिक प्रयत्नांची ताकद आणि राष्ट्रनिर्मितीत युवकांची जबाबदारी यावर सखोल विचार मांडले. विविध सत्रांमधून विद्यार्थ्यांना प्रेरणा, दिशा आणि प्रत्यक्ष कार्याचे भान मिळाले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या मॉडेल्स व सर्जनशील मांडणीतून एकजूट, सहकार्य आणि सामायिक जबाबदारी हीच सामाजिक परिवर्तनाची खरी शक्ती असल्याचे स्पष्ट झाले.

या परिषदेत एकूण २०३ विद्यार्थी (६१ मुलगे व १४२ मुली), तसेच ११८ शिक्षक सहभागी झाले, तर ४६ संशोधन सारांश सादर करण्यात आले. प्रा. शिवाजी नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. सुचित्रा ए. नाईक व डॉ. विनोद चांदवानी यांच्या समन्वयातून परिषद यशस्वीरीत्या पार पडली. प्राचार्या डॉ. श्वेता अहिरे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित या उपक्रमातून सामूहिक सेवेमधून समाजात सकारात्मक परिवर्तन घडविण्याचा प्रभावी संदेश देण्यात आला.

महाविद्यालयातील मल्टिमीडिया आणि मास कम्युनिकेशन विभागामार्फत 'डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमाला' अंतर्गत ४७ व्या पुष्पाचे आयोजन करण्यात आले होते. मंगळवार, २० जानेवारी २०२६ रोजी पाणिनी सभागृहात पार पडलेल्या या सत्रात ज्येष्ठ लेखक आणि संशोधक डॉ. प्रदीप कर्णिक यांनी 'पुस्तकांचे डिजिटायझेशन' या विषयावर विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. प्रत्यक्ष पुस्तकांचे ऑनलाइन आणि शोधण्यायोग्य (searchable) डिजिटल स्वरूपात रूपांतर कसे केले जाते याची प्रक्रिया त्यांनी यावेळी समजावून सांगितली. स्कॅनिंगपासून ते AI च्या सहाय्याने मजकूर संपादन करण्यापर्यंतचे टप्पे सांगतानाच, त्यांनी मराठी भाषा आणि साहित्याचा वारसा जतन करण्यासाठी तंत्रज्ञानाची भूमिका किती महत्त्वाची आहे हे अधोरेखित केले. भविष्यातील पिढ्यांसाठी आणि संशोधनासाठी डिजिटल पुस्तके अत्यंत लाभदायी असल्याचे त्यांनी नमूद केले. प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, उपप्राचार्य डॉ. महेश पाटील आणि प्रा. इशिता प्रधान यांच्या मार्गदर्शनाखाली हे यशस्वी सत्र संपन्न झाले.

महाविद्यालयातील मल्टिमीडिया आणि मास कम्युनिकेशन विभागाद्वारे 'डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमाला' अंतर्गत ४८ व्या पुष्पाचे आयोजन करण्यात आले होते. बुधवार २१ जानेवारी २०२६ रोजी महाविद्यालयाच्या पाणिनी सभागृहात पार पडलेल्या या सत्रात 'निर्माण फाऊंडेशन'चे कार्यक्रम संचालक श्री. अमृत बंग यांनी प्रमुख पाहुणे म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. राष्ट्र उभारणीत तरुणांची भूमिका किती महत्त्वाची आहे यावर भाष्य करताना त्यांनी निर्माण फाऊंडेशनच्या कार्याची माहिती दिली. तरुण पिढीमध्ये नेतृत्वगुण, सामाजिक जबाबदारी आणि प्रत्यक्ष जीवनातील समस्यांविषयी जागरूकता निर्माण करणे हा या संस्थेचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. युवकांनी तळागाळातील समस्या समजून घेण्यासाठी प्रत्यक्ष कामात सहभागी व्हावे आणि समाजातील प्रश्नांवर उपाय शोधण्यासाठी पुढाकार घ्यावा असे आवाहन त्यांनी केले. विद्यार्थ्यांना जबाबदार नागरिक बनून समाजासाठी अर्थपूर्ण योगदान देण्यास प्रवृत्त करणाऱ्या या कार्यक्रमासाठी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, उपप्राचार्य डॉ. महेश पाटील आणि प्रा. इशिता प्रधान यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

महाविद्यालयातील मल्टिमीडिया आणि मास कम्युनिकेशन विभागातर्फे २२ जानेवारी २०२६ रोजी 'डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमाला' (पुष्प ४९) आयोजित करण्यात आली होती. यावेळी प्रसिद्ध बुद्धिबळपटू पद्मश्री अनुपमा गोखले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आपला शालेय जीवनापासूनचा व्यावसायिक खेळाडू बनण्यापर्यंतचा प्रेरणादायी प्रवास उलगडला. तंत्रज्ञान उपलब्ध नसतानाच्या काळात केवळ शिस्त आणि स्वावलंबनाच्या जोरावर परदेशातील स्पर्धांमध्ये मिळवलेले यश सांगतानाच, त्यांनी यशासाठी संयम आणि धोरणात्मक विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, उपप्राचार्य डॉ. महेश पाटील आणि प्रा. इशिता प्रधान यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या सत्राने विद्यार्थ्यांना आपल्या आवडीच्या क्षेत्रात जिद्दीने काम करण्याची प्रेरणा दिली.

महाविद्यालयातील सेल्स अँड मार्केटिंग मॅनेजमेंट (BVoc) विभागाद्वारे विद्यार्थ्यांसाठी 'प्रोफेशनल इटिकेट रिकॉल (Professional etiquette recall) या विशेष सत्राचे आयोजन करण्यात आले होते. बुधवार, २१ जानेवारी २०२६ रोजी पार पडलेल्या या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांची स्मरणशक्ती, एकाग्रता आणि निरीक्षण कौशल्य वाढवणे हा होता.

या सत्रामध्ये विद्यार्थ्यांना व्यावसायिक वातावरणाशी संबंधित महत्त्वाचे शिष्टाचार ओळखण्याचे आणि ते

लक्षात ठेवण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये Active Listening, Active Thinking करण्याची क्षमता आणि नेटवर्किंगसाठी आवश्यक कौशल्ये विकसित करण्यास मदत झाली. कॉर्पोरेट जगात वावरताना शिस्त आणि व्यावसायिकता किती महत्त्वाची आहे याची जाणीव या माध्यमातून करून देण्यात आली. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, उपप्राचार्य डॉ. महेश पाटील आणि बी. व्होक समन्वयक डॉ. अर्चना प्रभुदेसाई यांच्या मार्गदर्शनाखाली हा शैक्षणिक उपक्रम यशस्वीरित्या पार पडला.

## बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त)

### भविष्यासाठी शाश्वत प्रगती या संकल्पनेवर दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद

महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित उपयोजित प्राणीशास्त्रावरील दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद दिनांक २३ व २४ जानेवारी २०२६ रोजी अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाली. भविष्यासाठी शाश्वत प्रगती ही या परिषदेची मध्यवर्ती संकल्पना होती.

परिषदेचे उद्घाटन शुक्रवार, २३ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता थोरले बाजीराव पेशवे सभागृहात पारंपरिक दीपप्रज्ज्वलन व सरस्वती वंदनेने करण्यात आले. उद्घाटन समारंभास विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, लॅब इंडिया प्रा. लि. चे मुख्य व्यवस्थापकीय संचालक श्री. श्रीकांत बापट, हायमीडिया लॅबोरेटरीजचे संचालक डॉ. राहुल वारके, तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रा. डॉ. विंदा मांजरमकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

उद्घाटनपर भाषणात प्रा. डॉ. विंदा मांजरमकर यांनी शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यात उपयोजित प्राणीशास्त्राची निर्णायक भूमिका अधोरेखित केली. पदवी व पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणावरील सहभाग ही महाविद्यालयातील संशोधन संस्कृतीची सकारात्मक दिशा असल्याचे त्यांनी नमूद केले. डॉ. विजय बेडेकर यांनी संशोधनातील नियतकालिकांचे महत्त्व, संशोधनाची गुणवत्ता, तसेच नवोदित संशोधकांना योग्य मार्गदर्शन मिळण्याची आवश्यकता यावर सखोल प्रकाश टाकला. मार्गदर्शनपर भाषणात श्री. श्रीकांत बापट यांनी पर्यावरण संवर्धन, जैवविविधता, सार्वजनिक आरोग्य व जैवतंत्रज्ञान या क्षेत्रांमध्ये अनुप्रयुक्त प्राणीशास्त्र संशोधनाचे मोलाचे योगदान स्पष्ट केले. डॉ. राहुल वारके यांनी शाश्वत जैविक उपाय विकसित करण्यासाठी वैज्ञानिक संशोधन अपरिहार्य असल्याचे अधोरेखित केले. याप्रसंगी परिषदेतील संशोधन पेपरच्या सारांचे पुस्तक (Abstract Book) प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आले. उद्घाटन सत्राचे सूत्रसंचालन डॉ. ऊर्मिला कुमावत यांनी केले, तर डॉ. किरण परिया यांनी आभार प्रदर्शन केले.

महाविद्यालयाने आजवर २३ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांचे यशस्वी आयोजन केले असून, प्राणीशास्त्र विभागातर्फे आयोजित ही २४ वी परिषद होती. परिषदेत एकूण १० ऑफलाईन व २ ऑनलाईन सत्रांचे आयोजन करण्यात आले.

परिषदेच्या पहिल्या दिवशी फ्लोरिडा विद्यापीठातील कीटकशास्त्र विभागातील सहयोगी प्राध्यापक डॉ. लॉरेन एम. डायपेनब्रॉक यांनी 'एचएलबी-प्रभावित लिंबूवर्गीय फळांमध्ये एकात्मिक कीटक व्यवस्थापन' या विषयावर मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. प्रताप माळी यांनी 'हवामान बदलामुळे पोषण, संसर्गजन्य रोग व मानसिक आरोग्यावर होणाऱ्या परिणामांचे विश्लेषण' सादर केले. प्रा. डॉ. अरुण खरात यांनी 'कर्करोगविरोधी व प्रतिजैविक अनुप्रयोगांसाठी व्युत्पन्न चांदीच्या नॅनोपार्टिकल्स' या

विषयावरील संशोधन मांडले. डॉ. धीरज धोत्रे यांनी 'इंडियन ह्यूमन मायक्रोबायोम' या विषयावर मार्गदर्शन करत 'दैनंदिन आहाराचे आरोग्यावरील महत्त्व' स्पष्ट केले. ऑनलाईन माध्यमातून येमेन येथील थामर विद्यापीठाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. फहद एम. अब्दअलगलील यांनी 'डिप्टेरा कीटकांवरील जैविक नियंत्रण' या विषयावर व्याख्यान दिले. कझाकस्तान येथील संशोधक सुश्री अल्योना काल्प्टोनकिना यांनी 'गिधाड प्रजातींची सद्यस्थिती, त्यांचे पर्यावरणीय महत्त्व व संवर्धनातील आव्हाने' यावर सखोल मांडणी केली. परिषदेच्या दुसऱ्या दिवशी नेदरलँड्स येथील तज्ज्ञ पक्षीशास्त्रज्ञ प्रा. तेज मुंडकुर यांनी 'पक्ष्यांच्या स्थलांतर प्रक्रियेवर' अत्यंत अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. 'विविध खंडांमधून हजारो किलोमीटर अंतर पार करणारे पक्षी आपले अस्तित्व व हालचाली कशा नोंदवतात, यामागील वैज्ञानिक यंत्रणा' त्यांनी स्पष्ट केली. तसेच प्रा. डॉ. शैल के. चौबे यांनी 'पर्यावरणीय व शारीरिक ताण-तणावांचा सस्तन प्राण्यांच्या पुनरुत्पादन क्षमतेवर होणारा परिणाम' स्पष्ट केला. परिषदेच्या समारोप सत्रास डॉ. अरविंद इंगळे आणि (ACTREC) श्री. भालचंद्रसिंग रावराणे (अध्यक्ष, फेडरेशन ऑफ इंडस्ट्रीज ऑफ इंडिया) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

ही दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद २४ जानेवारी २०२६ रोजी संपन्न झाली. परिषदेत एकूण १२ नामवंत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय वक्त्यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. परिषदेचे यशस्वी आयोजन डॉ. किरण परिया, डॉ. अभय मोराजकर, डॉ. निलेश जवळकर, प्रा. साक्षी दांडेकर, प्रा. निकिता, प्रा. सलोनी आणि डॉ. अश्विनी टिळक यांनी उत्कृष्ट समन्वयातून केले.

विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती विकसित व्हावी यासाठी महाविद्यालयातर्फे वर्षभर विविध कार्यशाळा, पोस्टर सादरीकरणे, संशोधन उपक्रम व आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन करण्यात येते. त्याचाच एक महत्त्वाचा भाग म्हणून ही आंतरराष्ट्रीय परिषद अत्यंत यशस्वी ठरली. या परिषदेमुळे प्राणीशास्त्र, पर्यावरण, जैवविविधता व आधुनिक संशोधन क्षेत्रातील अद्ययावत ज्ञानाचा मोठा लाभ संशोधक, प्राध्यापक व विद्यार्थ्यांना झाला.






**'माझे ग्रंथालय - ग्रंथपेटी' योजनेअंतर्गत ग्रंथालय विभागातर्फे लेखक तुमच्या भेटीला कार्यक्रम आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी.**

दिनांक ०३.०१.२०२६ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीचे औचित्य साधून, तसेच 'माझे ग्रंथालय - ग्रंथपेटी' योजनेअंतर्गत ग्रंथालय विभागातर्फे 'लेखक तुमच्या भेटीला' हा विशेष उपक्रम उत्साहात आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी प्रसिद्ध लेखिका सौ. नयना वैद्य यांना प्रमुख पाहुण्या म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी त्यांच्या 'कुरुक्षेत्र ते कारगिल' या पुस्तकाविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. या पुस्तकामधून भारतीय इतिहासातील महत्त्वपूर्ण युद्धप्रसंग, त्यामागील सामाजिक, राजकीय व नैतिक मूल्यांची मांडणी प्रभावीपणे करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले. महाभारतातील कुरुक्षेत्राच्या युद्धापासून ते कारगिल युद्धापर्यंतच्या प्रवासाचे त्यांनी अत्यंत समर्पक आणि अभ्यासपूर्ण विश्लेषण उपस्थितांसमोर मांडले.

लेखिकेने विद्यार्थ्यांशी संवाद साधत पुस्तक लेखनाची प्रेरणा, संशोधन प्रक्रिया तसेच देशभक्ती आणि कर्तव्यभावना यांचे महत्त्व स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्तपणे प्रश्न विचारून शंकांचे निरसन करून घेतले.

कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होऊन इतिहासाविषयीची जिज्ञासा वाढीस लागली.

या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्र संचालन ग्रंथपाल सौ. कादंबरी मांजरेकर यांनी केले, तर माझे ग्रंथालय योजनेच्या सौ. रेखा देखणे यांच्या आभार प्रदर्शनाने या साहित्यिक कार्यक्रमाची सांगता झाली.







## वाचन संकल्प महाराष्ट्राचा

'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमाअंतर्गत ग्रंथालय विभागातर्फे ७ जानेवारी ते १३ जानेवारी २०२६ दरम्यान विविध उपक्रम आयोजित करण्यात आले.

७ जानेवारी २०२६ रोजी 'शब्दकोश प्रदर्शन' आयोजित करण्यात आले. या प्रदर्शनाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, तसेच विविध प्रकारच्या शब्दकोशांची माहिती करून देणे हा होता. या प्रदर्शनात मराठी, हिंदी, इंग्रजी, तसेच द्विभाषिक शब्दकोश, समानार्थी शब्दकोश, तांत्रिक शब्दकोश इत्यादी विविध प्रकारची पुस्तके मांडण्यात आली होती. विद्यार्थ्यांना शब्दकोशांचा उपयोग, त्यातील माहिती शोधण्याची पद्धत आणि त्यांचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाला एकूण ३२ विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी प्रदर्शनास उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध शब्दकोशांची पाहणी केली व माहिती जाणून घेतली.

८ जानेवारी २०२६ रोजी 'विश्वकोश प्रदर्शन' आयोजित करण्यात आले. एखाद्या विषयावर शास्त्रशुद्ध व मूलभूत माहिती मिळविण्यासाठी विश्वकोश कसा उपयोगी ठरतो याबाबत जागरूकता निर्माण करणे हा उद्देश या प्रदर्शनामागे होता. मराठी, हिंदी, संस्कृत, विज्ञान व तंत्रज्ञान यावरील विश्वकोश या प्रदर्शनात मांडण्यात आले होते. या कार्यक्रमाला एकूण ३१ विद्यार्थी उपस्थित होते

९ जानेवारी २०२६ रोजी 'सामान्यज्ञान' विषयावरील पुस्तकांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे व सामान्यज्ञान वाढीस लागणे हा होता. या प्रदर्शनामध्ये विविध विषयांवरील सामान्यज्ञानाची पुस्तके मांडण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी पुस्तकांची पाहणी करून त्यातील माहिती जाणून घेतली, तसेच काही विद्यार्थ्यांनी पुस्तके वाचनासाठी घेतली. कार्यक्रमास एकूण २९ विद्यार्थी उपस्थित होते.

१० जानेवारी २०२६ रोजी नामांकित 'स्त्री लेखिकांनी लिहिलेल्या पुस्तकांचे प्रदर्शन' आयोजित करण्यात आले. या प्रदर्शनामध्ये साहित्याच्या विविध प्रकारांमध्ये कादंबरी, कथा, कविता, आत्मचरित्र, प्रेरणादायी साहित्य, तसेच बालसाहित्य यांचा समावेश होता. या उपक्रमाचा मुख्य उद्देश स्त्री साहित्यिकांच्या साहित्यकार्याची ओळख करून देणे हा होता. विद्यार्थ्यांनी प्रदर्शनास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. एकूण ३१ विद्यार्थी या कार्यक्रमाला उपस्थित होते. त्यांनी विविध पुस्तकांची पाहणी करून त्याविषयी माहिती जाणून घेतली.

१३ जानेवारी २०२६ रोजी 'फळे आणि भाज्या' या विषयावरील पुस्तकांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. या प्रदर्शनाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये फळे व भाज्यांचे पौष्टिक घटक व त्याचा आपल्या शरीरावर होणारा सकारात्मक उपयोग समजावून देणे हा होता. प्रदर्शनामध्ये विविध प्रकारची माहितीपूर्ण पुस्तके, चित्रमय पुस्तके, तसेच आरोग्यविषयक संदर्भग्रंथ मांडण्यात आले होते. या प्रदर्शनाला एकूण ५० वाचकांनी भेट दिली.

अशा प्रकारे वाचकांना विविध प्रकारच्या वाचन साहित्याची ओळख करून देण्याचा प्रयत्न या प्रदर्शनाच्या माध्यमातून ग्रंथालयातर्फे करण्यात आला. विद्यार्थ्यांनी उत्साहाने प्रदर्शनाला भेट देऊन पुस्तके वाचनासाठी घेण्याचीही इच्छा व्यक्त केली.

### वाचन संकल्प महाराष्ट्राचा









### स्वामी विवेकानंद जयंती आणि माँसाहेब जिजाबाई भोसले जयंती :

दिनांक १२.०१.२०२६ रोजी महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागामध्ये स्वामी विवेकानंद जयंती, तसेच माँसाहेब जिजाबाई भोसले जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात ग्रंथपाल सौ. कादंबरी मांजरेकर यांच्या हस्ते स्वामी विवेकानंद व माँसाहेब जिजाबाई भोसले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी दोन्ही महान व्यक्तिमत्त्वांच्या जीवनकार्याविषयी माहिती देण्यात आली. त्यांच्या कार्याचा विद्यार्थ्यांवर सकारात्मक प्रभाव पडावा या उद्देशाने ग्रंथालयात संबंधित पुस्तकांचे प्रदर्शनही आयोजित करण्यात आले. विद्यार्थ्यांनी प्रदर्शनास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या कार्यक्रमास एकूण ३२ विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन ग्रंथालय विभागामार्फत यशस्वीपणे करण्यात आले.




### मराठी भाषा संवर्धन पंधरावडा :

'मराठी भाषा संवर्धन पंधरावडा' या उपक्रमाअंतर्गत ग्रंथालय विभागातर्फे २० जानेवारी ते २२ जानेवारी २०२६ दरम्यान विविध उपक्रम आयोजित करण्यात आले.

दिनांक २० जानेवारी २०२६ रोजी 'मराठी कथा व कादंबरी' या विषयावरील पुस्तकांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. या प्रदर्शनाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेतील पुस्तकांच्या वाचनाची आवड निर्माण करणे व मराठी साहित्याची ओळख करून देणे हा होता. या प्रदर्शनामध्ये विविध नामांकित लेखकांच्या कथा व कादंबऱ्यांची पुस्तके मांडण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी उत्साहाने प्रदर्शनाला भेट देऊन पुस्तकांची माहिती जाणून घेतली. काही विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीची पुस्तके वाचनासाठी घेण्याची इच्छा व्यक्त केली. या कार्यक्रमाला एकूण ४४ विद्यार्थी उपस्थित होते.

दिनांक २१ जानेवारी २०२६ रोजी 'मराठी काव्यसंग्रह' पुस्तकांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. या प्रदर्शनाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये काव्यवाचनाची गोडी वाढविणे हा होता. प्रदर्शनामध्ये विविध नामवंत कवींचे काव्यसंग्रह मांडण्यात आले होते. कुसुमाग्रज, बा. भ. बोरकर, मंगेश पाडगांवकर, शांता शेळके, सुरेश भट यांसारख्या कवींच्या पुस्तकांचा समावेश होता. पुस्तकांची मांडणी सुबक व आकर्षक पद्धतीने करण्यात आली होती,

ज्यामुळे विद्यार्थ्यांचे विशेष लक्ष वेधले गेले. यावेळी एकूण ५७ विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी उत्साहाने प्रदर्शनाला भेट दिली व विविध काव्यसंग्रहांची माहिती जाणून घेतली. काही विद्यार्थ्यांनी आवडती पुस्तके वाचण्यासाठी घेण्याचीही इच्छा व्यक्त केली.

दि. २२ जानेवारी २०२६ रोजी धार्मिक ग्रंथांचे पुस्तक प्रदर्शन आयोजित करण्यात आले. या प्रदर्शनाचा उद्देश विद्यार्थ्यांना मराठी भाषेतील विविध धार्मिक साहित्याची ओळख करून देणे हा होता. या प्रदर्शनामध्ये भगवद्गीता, रामायण, महाभारत, दासबोध, ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा इत्यादी विविध धार्मिक ग्रंथ मांडण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी प्रदर्शनास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या कार्यक्रमाला एकूण ६२ विद्यार्थी उपस्थित होते.

सदर प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेप्रती वाचनाची आवड वाढीस लागली असून, कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.










**सुभाषचंद्र बोस जयंती व बाळासाहेब ठाकरे जयंती :**

दिनांक २३ जानेवारी २०२६ रोजी महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागात नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती, तसेच बाळासाहेब ठाकरे जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाची सुरुवात ग्रंथपाल सौ. कादंबरी मांजरेकर यांनी या थोर व्यक्तींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून केली.

कार्यक्रमात नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांच्यावरील माहिती विद्यार्थ्यांसमोर मांडण्यात आली, तसेच त्यांच्या जीवनावर आधारित पुस्तक प्रदर्शन आयोजित केले गेले. या पुस्तक प्रदर्शनाद्वारे विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्याची आणि योगदानाची अधिक माहिती मिळाली. यावेळी एकूण ६१ विद्यार्थी उपस्थित होते.




**महात्मा गांधी पुण्यतिथी :**

दिनांक ३० जानेवारी २०२६ रोजी महात्मा गांधी पुण्यतिथी निमित्त डॉ. वीणा ठाकरे, ग्रंथपाल, रुईया महाविद्यालय, माटुंगा आणि डॉ. भूपेंद्र बनसोड, ग्रंथपाल, पी.वी.डी.टी. कॉलेज ऑफ एज्युकेशन, चर्चगेट, यांनी महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. महात्मा गांधी यांच्यावरील माहिती, तसेच संबंधित पुस्तके प्रदर्शनात ठेवण्यात आली, ज्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांचे जीवन आणि विचार यांविषयी अधिक माहिती मिळाली.



**एम. लिब प्रकल्प विषय निश्चिती व शोधनिबंध सादरीकरण शिबिर अहवाल :**

महाविद्यालयात चालवल्या जाणाऱ्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ग्रंथालय आणि

माहितीशास्त्र निष्णात या अभ्यासक्रमांचे २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षाचे शिबिर दि.२९.०१.२०२६ ते ३०.०१.२०२६ या दिवशी पार पडले. सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.०० या वेळेत शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. दि.२९ जानेवारी २०२६ रोजी या शिबिराचे उद्घाटन शिबिर तज्ज्ञ डॉ. भूपेंद्र बनसोड, ग्रंथपाल, पी.वी.डी.टी. कॉलेज ऑफ एज्युकेशन, चर्चगेट, मुंबई व डॉ.वीणा ठाकरे, ग्रंथपाल, रुईया महाविद्यालय, माटुंगा, मुंबई व प्रमुख पाहुणे प्रा. नारायण बारसे, जोशी बेडेकर महाविद्यालय ठाणे यांच्या हस्ते झाले.

या शिबिरासाठी बा. ना. बांदोडकर अभ्यासकेंद्राचे एकूण १४ विद्यार्थी पूर्णवेळ उपस्थित होते. या शिबिरामध्ये १४ विद्यार्थ्यांनी प्रकल्प आराखडे व शोधनिबंध सादर केले व तज्ज्ञ मार्गदर्शकांच्या सुचनेनुसार १३ विद्यार्थ्यांचे प्रकल्प आराखडे मंजूर झाले.

या शिबिराची सांगता दि.३०.०१.२०२६ रोजी झाली. या कार्यक्रमासाठी शिबिर तज्ज्ञ डॉ. भूपेंद्र बनसोड, डॉ.वीणा ठाकरे, आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एम.लिब. अभ्यासक्रमाची विद्यार्थिनी श्रुती काजरे यांनी केले. शिवानी शेट्ये, ईशान कल्याणकर, नम्रता जोशी आणि मंजुळा गोहिल या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. व आभार प्रदर्शन श्रेया सावंत ह्या विद्यार्थिनीने केले. यावेळी दोन्ही तज्ज्ञ मार्गदर्शक यांनी मार्गदर्शनपर भाषण केले. राष्ट्रगीताने या शिबिराची सांगता झाली.







**विद्या प्रसारक मंडळाचे**
**ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय**

**२ जानेवारी २०२६ – ६५ वा महाराष्ट्र पोलिस वर्धापन दिन सोहळा :**



ठाणे येथील साकेत पोलिस परेड ग्राउंड वर २ जानेवारी २०२६ रोजी आयोजित ६५ व्या महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिन सोहळ्यासाठी आमच्या संस्थेला मिळालेल्या निमंत्रणाचा स्वीकार करून, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार आणि ५० विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाला उपस्थिती लावली. यावेळी पोलिस संचलन पथक (Police Drill Unit), जलद प्रतिसाद पथक (QRT), बॉम्ब शोधक व नाशक पथक (BDDS) आणि श्वान पथकाद्वारे करण्यात आलेली प्रभावी प्रात्यक्षिके पाहण्याची संधी आम्हास मिळाली. महाराष्ट्र पोलिस दलाने प्रदर्शित केलेली शिस्त, व्यावसायिकता आणि सज्जता पाहून विद्यार्थी भारावून गेले आणि त्यांच्यावर याचा खोलवर प्रभाव पडला. अशा उपक्रमांमुळे विधीच्या विद्यार्थ्यांना कायदा व सुव्यवस्था राखण्यात आणि सार्वजनिक सुरक्षा सुनिश्चित करण्यात पोलिस दलाची नेमकी भूमिका काय असते, हे समजण्यास मोलाची मदत होते. हा अनुभव विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक तसेच प्रेरणादायी ठरला. संचलन आणि प्रात्यक्षिके

पाहण्याचा आनंद सर्व विद्यार्थ्यांनी उत्साहाने घेतला. आम्हाला ही संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आम्ही ठाणे पोलिस दलाचे अत्यंत ऋणी आहोत.

३ जानेवारी २०२६ रोजी CDC आणि IQAC यांची संयुक्त बैठक पार पडली.

**३ जानेवारी २०२५ – वीर बाल दिवस वक्तृत्व स्पर्धा**

वि.प्र.मं. चे विधी महाविद्यालय, ठाणे यांच्या वतीने २६ डिसेंबर २०२५ रोजी 'वीर बाल दिवस' निमित्त वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. शिखांचे दहावे गुरू श्री गुरु गोविंद सिंगजी यांचे धाकटे सुपुत्र साहिबजादा जोरावर सिंगजी आणि साहिबजादा फतेह सिंगजी यांच्या असीम धैर्य आणि बलिदानाचा सन्मान करण्यासाठी दरवर्षी २६ डिसेंबर हा दिवस 'वीर बाल दिवस' म्हणून पाळला जातो.

विषयाची मौलिकता, समर्पकता आणि स्पष्टता या निकषांवर आधारित, ॲड. अंबर जोशी यांनी या स्पर्धेचे परीक्षण केले आणि खालील स्पर्धकांना विजयी घोषित केले:

**स्पर्धेचे विजेते:**

- प्रथम क्रमांक : अवधूत वीरकर (प्रथम वर्ष विधी)
- द्वितीय क्रमांक : अनिकेत जाधव (द्वितीय वर्ष विधी)
- तृतीय क्रमांक : व्यंकटेश अय्यर (तृतीय वर्ष विधी)

या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला. तरुणांमध्ये शौर्य, श्रद्धा आणि नैतिक शक्तीची मूल्ये रुजवण्यासाठी विद्यार्थ्यांनी आपले विचार अत्यंत प्रभावीपणे मांडले. सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले आणि त्यांना भविष्यात अशा अनेक स्पर्धांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले. तसेच, शौर्य आणि नागरी जबाबदारीचा संदेश प्रसारित करण्यासाठी सर्व सहभागी स्पर्धकांनी केलेल्या कौतुकास्पद प्रयत्नांबद्दल त्यांचे आभार मानले. या स्पर्धेचे आयोजन आदरणीय प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. मनोजकुमार नाईक यांनी केले.




वि.प्र.मं चे विधी महाविद्यालयाचे नवीन संकेतस्थळ ९ जानेवारी २०२६ रोजी पासून कार्यरत झाली.

**मतदार जागरूकता ९ जानेवारी २०२६**

लोकशाही मजबूत करण्यासाठी आपले मौल्यवान मत देणे ही आपली जबाबदारी आहे या ब्रीद वाक्याने प्रेरित होऊन 'निवडणूक साक्षरता क्लब' (Electoral Literacy Club) यांच्या वतीने आगामी टीएमसी निवडणूक (दिनांक १५/०१/२०२६) च्या पार्श्वभूमीवर मतदार जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश मतदारांमध्ये मतदानाचे महत्त्व पटवून देणे व लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभागासाठी प्रोत्साहन देणे हा होता.

या कार्यक्रमात प्रथम वर्ष एल.एल.बी. ते तृतीय वर्ष एल.एल.बी. पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून मतदार शपथ घेतली. ही शपथ प्राध्यापिका कु. कृष्णा कामत यांनी मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये उद्घोषित केली, ज्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना तिचा अर्थ स्पष्टपणे समजला.

प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांच्या मार्गदर्शन व प्रेरणेमुळे, निवडणूक साक्षरता क्लबच्या सदस्य

प्राध्यापिका प्रा. हेतल मेशेरी व प्रा. यतीन पंडित, तसेच इतर सर्व प्राध्यापकांच्या सहकार्याने मतदार जनजागृती रॅली आयोजित करण्यात आली. मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी या रॅलीत सहभाग घेत निवासी परिसर व वर्दळीच्या रस्त्यांवर घोषणा देत नागरिकांना मतदानासाठी प्रोत्साहित केले.

या कार्यक्रमादरम्यान द्वितीय वर्ष एल.एल.बी.चे विद्यार्थी श्री. अनिरुद्ध खांबे यांनी मराठी भाषेत मतदानाची पद्धत व प्रक्रिया स्पष्ट करून सांगितली, ज्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना मतदान प्रक्रिया समजण्यास मदत झाली.

सदर कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये, तसेच नागरिकांमध्ये मतदानाबाबत जागरूकता निर्माण झाली असून, लोकशाही मजबूत करण्यासाठी जबाबदार व सुजाण मतदानाचे महत्त्व अधोरेखित झाले.




**डॉ. व्ही. एन. बेडेकर स्मृती व्याख्यान : डिजिटल वैयक्तिक डेटा संरक्षण कायदा, २०२३**

वि प्र मं चे विधी महाविद्यालय, ठाणे यांनी शनिवार, १० जानेवारी २०२६ रोजी मूट कोर्ट हॉलमध्ये डॉ. व्ही. एन. बेडेकर स्मृती व्याख्यानाचे आयोजन केले होते. या व्याख्यानाचे उद्दिष्ट डिजिटल वैयक्तिक डेटा संरक्षण कायदा, २०२३ वरील एक प्राथमिक कार्यक्रम या विषयावर सीएस रंगनाथ खानोलकर यांनी केले.

कार्यक्रमाची सुरुवात सहाय्यक प्रा. सी एस यतीन पंडित यांच्या उद्घाटन आणि स्वागत भाषणाने झाली. त्यांनी मान्यवर, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांचे स्वागत केले आणि सध्याच्या डिजिटल आणि कायदेशीर परिस्थितीत व्याख्यानाची थीम आणि प्रासंगिकता थोडक्यात मांडली.

त्यानंतर प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी पाहुण्यांचा सत्कार करून स्वागतपर भाषण केले. त्यांनी डॉ. व्ही. एन. बेडेकर स्मृती व्याख्यान मालिकेबद्दल श्रोत्यांना माहिती दिली आणि विद्या प्रसारक मंडळाचे (व्हीपीएम) माजी अध्यक्ष स्वर्गीय श्री. व्ही. एन. बेडेकर यांचे दूरदर्शी योगदान अधोरेखित केले. शैक्षणिक मूल्ये, संस्थात्मक प्रशासन आणि शैक्षणिक उत्कृष्टता मजबूत करण्याच्या त्यांच्या चिरस्थायी वारशावर त्यांनी भर दिला, ज्याचे स्मरण करण्यासाठी आणि ते कायम ठेवण्यासाठी स्मृती व्याख्यान माला प्रयत्नशील आहे. प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना अशा शैक्षणिक कार्यक्रमांमध्ये सक्रियपणे सहभागी होण्यास प्रोत्साहित केले जे समकालीन कायदेशीर शिक्षणासह संस्थात्मक वारसा एकत्र करतात.

मुख्य सत्राचे भाषण सीएस रंगनाथ खानोलकर यांनी केले. त्यांनी डिजिटल वैयक्तिक डेटा संरक्षण कायदा, २०२३ चा सविस्तर आणि व्यावहारिक आढावा दिला. व्याख्यानात कायद्याची उद्दिष्टे, प्रमुख कायदेशीर संकल्पना, कायद्याअंतर्गत अधिकार आणि जबाबदाऱ्या आणि व्यक्ती, संस्था आणि कायदेशीर व्यावसायिकांसाठी त्याचे परिणाम यांचा समावेश होता. वक्त्याने अनुपालनाच्या व्यावहारिक आव्हानांवर आणि कॉर्पोरेट, नियामक आणि खटल्याच्या पद्धतींमध्ये डेटा संरक्षण कायद्याची वाढती प्रासंगिकता यावर देखील चर्चा केली, ज्यामुळे हे सत्र कायद्याच्या विद्यार्थ्यांसाठी विशेषतः मौल्यवान बनले.

एक संवादात्मक प्रश्नोत्तर सत्र झाले, ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी डेटा गोपनीयता, संमती यंत्रणा, नियामक अनुपालन आणि डेटा संरक्षण आणि तंत्रज्ञान कायद्यातील करिअरच्या संधींशी संबंधित मुद्यांवर वक्त्यांसोबत सक्रियपणे संवाद साधला.

कार्यक्रमात सुमारे १०० एलएलबी आणि एलएलएम विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग दिसून आला,

ज्यामुळे कायदेशीर व्यवहाराच्या उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये उत्सुकता दिसून आली. सहाय्यक प्रा. श्री. शिवाजी बिबे यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाचा समारोप झाला, त्यानंतर प्रा. कृष्णा कामत यांनी मतदानाची शपथ घेतली आणि राष्ट्रगीत सादर केले.

डॉ. व्ही. एन. बेडेकर स्मृती व्याख्यान हा एक महत्त्वाचा शैक्षणिक उपक्रम ठरला, ज्याने संस्थात्मक वारशाची समकालीन कायदेशीर प्रवचना यशस्वीरीत्या एकत्रित केली आणि विद्यार्थ्यांना निर्धारित अभ्यास-क्रमाच्या पलीकडे मौल्यवान ज्ञान दिले.




**मराठी वाङ्मय समिती आयोजित मराठी पंधरवडा २०२६**

मराठी पंधरवडा सोहळा  निमित्त स्पर्धांचे प्रकार : तात्काळ अभिनय स्पर्धा, गायन स्पर्धा, मराठीत ऐतिहासिक / Landmark न्यायनिर्णय सादरीकरण, निबंध लेखन स्पर्धा, कविता वाचन स्पर्धा

मराठी भाषा, साहित्य व संस्कृतीचे संवर्धन व्हावे तसेच विद्यार्थ्यांमध्ये मातृभाषेबद्दल अभिमान निर्माण व्हावा या उद्देशाने महाविद्यालयात मराठी पंधरवडा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या पंधरवड्याच्या अंतर्गत विविध सांस्कृतिक, साहित्यिक व शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्याचाच एक भाग म्हणून दिनांक २७ जानेवारी २०२६ रोजी तात्काळ अभिनय स्पर्धा आणि गायन स्पर्धा आयोजित करण्यात आली. या कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून सहाय्यक प्राध्यापक चंदनी घोगरे आणि सहाय्यक प्राध्यापक कृष्णा कामत यांनी कार्यक्रमाचे नियोजन व यशस्वी आयोजन केले. कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाच्या प्राचार्या मा. प्रा. श्रीमती श्रीविद्या जयकुमार मॅडम यांच्या अध्यक्षीय भाषणाने झाली. त्यांनी मराठी भाषेची गौरवशाली परंपरा, तिचे सांस्कृतिक महत्त्व आणि आजच्या पिढीने मराठी भाषेचे जतन व संवर्धन करण्याची गरज यावर मार्गदर्शन केले.

या स्पर्धांमध्ये सुमारे २० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी दिलेल्या विषयांवर त्वरित अभिनय सादर करून आपली कलात्मकता दाखवली, तसेच गायन स्पर्धेत विविध मराठी गीतांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.




कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक प्राध्यापक चंदनी घोगरे यांनी केले. कार्यक्रमाचे परीक्षक म्हणून मा. श्री. अम्बर जोशी आणि मा. ॲड. ईशा ओडेकर यांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे मूल्यमापन केले व मार्गदर्शनपर अभिप्राय दिला.

**स्पर्धेचे विजेते**

**तात्काळ अभिनय स्पर्धा:**

श्रावण पवार - प्रथम क्रमांक

प्रशांत राघतवन - द्वितीय क्रमांक

कल्पेश निकुंभ - तृतीय क्रमांक

**गायन स्पर्धा:**

हर्ष हजारे - प्रथम क्रमांक

शर्मिला तोडकर - द्वितीय क्रमांक




कार्यक्रमाच्या शेवटी सहाय्यक प्राध्यापक विनोद वाघ यांनी आभार प्रदर्शन करून समन्वयक प्राध्यापक, परीक्षक, सहभागी विद्यार्थी व उपस्थित प्राध्यापक व प्रेक्षकांचे आभार मानले. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण, प्रेरणादायी व यशस्वी वातावरणात पार पडला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेबद्दल प्रेम, अभिमान व सर्जनशीलता वाढण्यास निश्चितच मदत झाली.




**मराठी पंधरवड्यानिमित्त निबंध लेखन स्पर्धा उत्साहात शिस्तबद्ध वातावरणात संपन्न :**

विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे महानगरपालिका विधी महाविद्यालय येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी मराठी पंधरवडा मोठ्या उत्साहात आणि सांस्कृतिक वातावरणात साजरा करण्यात आला. मराठी भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसून; ती आपली सांस्कृतिक ओळख, वैचारिक परंपरा आणि सामाजिक जाणिवांचे प्रतिबिंब आहे, या भावनेतून महाविद्यालयामार्फत मराठी पंधरवड्याच्या कालावधीत विविध शैक्षणिक व साहित्यिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या मराठी पंधरवड्याच्या उपक्रमांमध्ये दि. २७ जानेवारी २०२६ रोजी निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. ही स्पर्धा महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच डॉ. रुपाली श्याम जामोदे यांच्या निरीक्षणाखाली अत्यंत शिस्तबद्ध, नियोजनबद्ध व यशस्वीपणे पार पडली. या स्पर्धेचा विषय 'न्यायालयाची भाषा - मराठी भाषा' असा अत्यंत महत्त्वाचा, समकालीन आणि विचारप्रवण निवडण्यात आला होता.

सदर विषयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना 'न्याय-व्यवस्थेमध्ये मराठी भाषेचे स्थान, सामान्य नागरिकांना न्यायप्रक्रिया समजण्यातील भाषेची भूमिका, तसेच न्यायालयीन व्यवहारात मातृभाषेच्या वापराचे सामाजिक व कायदेशीर महत्त्व' यावर सखोल विचार मांडण्याची संधी मिळाली. विद्यार्थ्यांनी आपल्या निबंधांमधून मराठी भाषेचा न्यायालयीन क्षेत्रातील वापर अधिक व्यापक व्हावा, यासाठी विविध अभ्यासपूर्ण व तर्कसंगत मते मांडली.

या निबंध लेखन स्पर्धेमध्ये एकूण ११ विद्यार्थ्यांनी विविध वर्गांतून सहभाग घेतला. सर्व सहभागी विद्यार्थ्यांनी विषयाची सखोल समज करून घेत, संदर्भांचा अभ्यास करून आपले विचार स्पष्ट, सुबक आणि प्रभावी भाषेत मांडले. त्यामुळे संपूर्ण स्पर्धा वैचारिकदृष्ट्या अत्यंत समृद्ध ठरली.

स्पर्धेचे मूल्यमापन करण्यासाठी श्री. बिपीन धुमाळे, बांदोडकर विद्यालयातील मराठी विषयाचे अनुभवी प्राध्यापक, यांची न्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यांनी सर्व निबंधांचे बारकाईने परीक्षण केले. निबंधांचे परीक्षण करताना त्यांनी विद्यार्थ्यांच्या लेखनशैली, विषयाची मांडणी, विचारांची सुसूत्रता आणि भाषेवरील प्रभुत्व यांचे विशेष कौतुक केले. आपल्या मनोगतात त्यांनी नमूद केले की, -

'निबंध अत्यंत सुरेख, अभ्यासपूर्ण आणि विचारप्रवण आहेत. दोन-तीन अपवाद वगळता सर्व विद्यार्थ्यांनीच

विषयाचा सखोल अभ्यास करून आपले विचार मांडले आहेत. हे निबंध वाचताना मलाही अनेक नवे आणि वेगळे दृष्टिकोन समजले.'

निबंध लेखन स्पर्धेचे मूल्यमापन खालील निकषांनुसार करण्यात आले होते -

विषयास अनुसरून मांडणी - २५ गुण
भाषेची शुद्धता - २५ गुण
विचारांची सुसूत्रता - २५ गुण
प्रस्तावना, मुख्य भाग व निष्कर्ष - २५ गुण
एकूण गुण - १००

या स्पर्धेमध्ये उत्कृष्ट लेखनाच्या आधारे तृतीय वर्षाची विद्यार्थिनी वैष्णवी विजय तेलंग हिने प्रथम क्रमांक पटकावला. प्रथम वर्षाचा विद्यार्थी सचिन दिलीप अहिरे याने द्वितीय क्रमांक, तर प्रथम वर्षाचा विद्यार्थी सुनील बाबुराव गवई याने तृतीय क्रमांक प्राप्त केला. विजेत्या विद्यार्थ्यांचे, तसेच सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयामार्फत अभिनंदन करण्यात आले. मराठी पंधरवड्यानिमित्त आयोजित करण्यात आलेली ही निबंध लेखन स्पर्धा विद्यार्थ्यांच्या वैचारिक विकासाला चालना देणारी, लेखनकौशल्य वृद्धिंगत करणारी आणि मराठी भाषेविषयी आत्मीयता निर्माण करणारी ठरली. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासपूर्ण लेखनाची आवड निर्माण होत असून, मराठी भाषेच्या संवर्धनासाठीही महत्त्वपूर्ण योगदान दिले जात आहे.



३ जानेवारी २०२६ पासून प्रथम वर्ष LL.M., द्वितीय विधी वर्ष (सत्र ४) आणि तृतीय विधी वर्ष (सत्र ६) चे व्याख्यान (तास) सुरू झाले.

वि.प्र.मं चे विधी महाविद्यालयाचे प्रा. मनोजकुमार नाईक यांनी राष्ट्रीय पोर्टलमध्ये अँटी-रॅगिंग अहवाल सादर केला.

मानसिक आरोग्याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या बाबतीत महाविद्यालयाकडून सूचना किंवा टिपण्या मागवण्यात आल्या होत्या, त्यानुसार प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार यांच्याकडून सूचना व टिपणी पाठविण्यात आल्या आहेत.

वि.प्र.मं चे विधी महाविद्यालयाचे प्रा. हेतल मेशेरी यांनी स्थानिक प्राधिकरण - जिल्हाधिकारी कार्यालयात पॉश अहवाल सादर केला.

**शिक्षक कर्मचाऱ्यांची कामगिरी :**

**न्यायमूर्ती अभय ओक यांचे पहिले मूलभूत अध्ययन (Seminal Learning Session) सत्र १ : गुन्ह्यांचा तपास १२ जानेवारी २०२६.**

माननीय निवृत्त न्यायमूर्ती न्यायमूर्ती श्री. अभय ओक यांच्या उपस्थितीत १२ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजता थोरले बाजीराव पेशवे सभागृह, व्ही.पी.एम. कॅम्पस, ठाणे येथे सेमिनल लर्निंग सत्र यशस्वीरीत्या आयोजित करण्यात आले. या सत्राचा मुख्य विषय गुन्ह्यांचा तपास असा असून, या सत्रात प्राध्यापकवर्ग, विद्यार्थी, तसेच विधी क्षेत्रातील तज्ज्ञांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.



डॉ. विनोद एच. वाघ यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथून यशस्वीरीत्या पीएच.डी अभ्यासक्रम पूर्ण केला.

या कार्यक्रमास डॉ. विजय बेडेकर, अध्यक्ष, विद्या प्रसारक मंडळ, कार्यकारीणी सदस्य श्री मराठे, श्री रसाळ, तसेच माननीय प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार यांची सन्माननीय उपस्थिती लाभली. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाची शैक्षणिक व संस्थात्मक प्रतिष्ठा अधिक वृद्धिंगत झाली.

कार्यक्रमाची सुरुवात माननीय प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. त्यांनी माननीय पाहुणे, उपस्थित मान्यवर, प्राध्यापकवर्ग व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक स्वागत केले. त्यानंतर डॉ. विजय बेडेकर, अध्यक्ष, विद्या प्रसारक मंडळ यांनी विशेष मार्गदर्शनपर भाषण केले. आपल्या भाषणात त्यांनी मराठी भाषेत विधी विषयक पुस्तके व अध्ययन साहित्य लेखनाचे महत्त्व अधोरेखित केले; तसेच मराठी भाषेत दर्जेदार कायदेविषयक साहित्य उपलब्ध होणे किती आवश्यक आहे, यावर प्रकाश टाकला. यामुळे विधी शिक्षण अधिक सर्वसमावेशक व सुलभ होईल, असे त्यांनी नमूद केले.

त्यानंतर माननीय न्यायमूर्ती श्री अभय ओक यांनी मुख्य व्याख्यान सादर केले. हे व्याख्यान अत्यंत माहितीपूर्ण, विचारप्रवर्तक व बौद्धिकदृष्ट्या समृद्ध होते. त्यांनी गुन्ह्यांच्या तपासाच्या विविध पैलूंवर सविस्तर मार्गदर्शन करताना, तपास प्रक्रियेत न्याय्यपणा, कायदेशीर प्रक्रियेचे पालन, घटनात्मक मूल्ये आणि न्यायालयीन देखरेखीचे महत्त्व अधोरेखित केले. या व्याख्यानामुळे विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना फौजदारी न्यायप्रणालीच्या व्यावहारिक व सैद्धांतिक पैलूंचे सखोल आकलन झाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृष्णा कामत यांनी अत्यंत कौशल्यपूर्ण पद्धतीने केले. संपूर्ण सत्रात शिस्तबद्ध तसेच सहभागात्मक शैक्षणिक वातावरण कायम राहिले.

कार्यक्रमाचा समारोप डॉ. रुपाली जामोडे यांनी केलेल्या आभारप्रदर्शनाने झाला. त्यांनी माननीय न्यायमूर्ती अभय ओक यांचे अमूल्य मार्गदर्शनासाठी, तसेच सर्व मान्यवर, आयोजक, प्राध्यापकवर्ग व विद्यार्थ्यांचे सहकार्य व सहभागाबद्दल मनःपूर्वक आभार मानले.

हा सेमिनार अत्यंत यशस्वी ठरला असून, विधी शिक्षण व शैक्षणिक चर्चेला मोलाचे योगदान देणारा महत्त्वपूर्ण शैक्षणिक उपक्रम ठरला.




**विद्यार्थी परिषद :**

शनिवार, २४ जानेवारी २०२६ रोजी आयोजित विद्यार्थी परिषदेच्या (Students' Council) पहिल्या बैठकीत खालील विद्यार्थ्यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन:

श्री. सचिन लवंगारे – सरचिटणीस (General Secretary)

श्री. अभिमीत खुशाल – क्रीडा सचिव (Sports Secretary)

कु. ज्ञानेश्वरी शिंदे – सांस्कृतिक सचिव (Cultural Secretary)

तसेच, आदरणीय प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली, 'महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६' च्या कलम ९९ नुसार शैक्षणिक

वर्ष २०२५-२०२६ साठी गठीत करण्यात आलेल्या 'हंगामी विद्यार्थी परिषदे'च्या सर्व विद्यार्थी प्रतिनिधींचे आणि नामांकित सदस्यांचेही आम्ही अभिनंदन करतो. आम्हाला विश्वास आहे की, ही विद्यार्थी परिषद विद्यार्थ्यांचे हित आणि महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी पूर्ण निष्ठा, शिस्त आणि सांघिक भावनेने कार्य करेल.

**पदसिद्ध अध्यक्ष (Ex-Officio Chairman)**

डॉ. श्रीविद्या जयकुमार, प्राचार्या

प्राचार्यांनी नियुक्त केलेले शिक्षक

श्री. विनोद एच. वाघ, श्री. यतीन पंडित

**विद्यार्थी प्रतिनिधी : तृतीय वर्ष विधी**

श्री. सचिन लवंगारे – विद्यार्थी प्रतिनिधी (मुलगा)

कु. ज्ञानेश्वरी शिंदे – विद्यार्थी प्रतिनिधी (मुलगी)

**द्वितीय वर्ष विधी**

श्री. अभिमित खुशाल – विद्यार्थी प्रतिनिधी (मुलगा)

कु. संजना साळवे – विद्यार्थी प्रतिनिधी (मुलगी)

**प्रथम वर्ष विधी**

श्री. श्रावण पवार – विद्यार्थी प्रतिनिधी (मुलगा)

कु. पूजा सोमवंशी – विद्यार्थी प्रतिनिधी (मुलगी)

**महिला प्रतिनिधी (प्राचार्यांनी नियुक्त केलेल्या)**

कु. शर्मिला तोडकर, कु. सिमरण विचारे.

३० जानेवारी २०२६ रोजी ठाणे न्यायालयात, ठाणे जिल्हा कायदेशीर सेवा प्राधिकरणाच्या बैठकीला प्राचार्य डॉ. श्री विद्या जयकुमार उपस्थित होते.





**एल.एल.एम :–** एल.एल.एम. दुसऱ्या वर्षाच्या विद्यार्थ्यांनी, (Classroom teaching) वर्गातील अध्यापनाचा सराव पूर्ण केला.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था

१० जानेवारी २०२६ : ब्रिम्सच्या औद्योगिक भेट समितीतर्फे डॉ. विभूती सावे यांनी कोकुयो कॅमलिन लिमिटेड, पाताळगंगा प्लांट येथे औद्योगिक भेटीचे आयोजन केले. डॉ. विभूती सावे आणि डॉ. कृष्णकांत लसुणे यांच्यासह एकूण ५० व्यवस्थापन विद्यार्थ्यांनी या भेटीत सहभाग घेतला. या औद्योगिक भेटीने उद्योग-शिक्षण क्षेत्रातील संबंध प्रस्थापित करण्यात आणि मजबूत करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. या भेटीमुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उत्पादन, कामकाज आणि प्रक्रिया व्यवस्थापन पद्धतींची महत्त्वपूर्ण माहिती मिळाली.




१२ जानेवारी २०२६ : एआयसीटीईच्या परिपत्रकानुसार, ब्रिम्सच्या विद्यार्थी विकास समिती तर्फे स्वामी विवेकानंदांच्या १६४ व्या जयंती निमित्ताने 'रन फॉर स्वदेशी (स्वदेशी संकल्प दौड)' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. दरवर्षी १२ जानेवारी हा दिवस 'राष्ट्रीय युवा दिन' म्हणूनही साजरा केला जातो. स्वामी विवेकानंदांच्या आदर्शांद्वारे तरुणांना प्रेरित करणे आणि स्वदेशी उत्पादनांचा वापर, सांघिक भावना, सामाजिक सहभाग व राष्ट्राप्रती जबाबदारीची भावना यांना प्रोत्साहन देणे, या उद्देशाने, ज्ञानद्विप संकुलाच्या प्रांगणात २ किमी / ३ किमी / ५ किमी अंतराच्या, स्वदेशी संकल्पनेला प्रोत्साहन देणाऱ्या स्वदेशी संकल्प दौड

उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात विद्यार्थी आणि प्राध्यापकांसह सुमारे ३५ धावपटूंनी सहभाग घेतला.




१७ जानेवारी २०२६: ब्रिम्सच्या इनोव्हेशन कौन्सिल (IIC), तर्फे ब्रिम्स आणि अनुवी केमिकल्स लिमिटेडच्या सहकार्याने 'अनुवी मार्केट लीडरशिप चॅलेंज' या स्पर्धेची अधिकृत घोषणा करण्यात आली. ही स्पर्धा 'होमबॉक्स मिनी'च्या वास्तविक जगातील व्यवसाय विस्ताराच्या आव्हानावर केंद्रित आहे, ज्यामुळे एमबीएच्या विद्यार्थ्यांना उत्पादन, स्थान आणि जाहिरात धोरणांवर काम करण्याची संधी मिळेल. अनुवी केमिकल्सच्या संचालिका, सुश्री अनुप्रिया जहागीरदार यांच्या अतिथी व्याख्यानाच्या दरम्यान या समस्येचे स्वरूप सादर करण्यात आले. अनुभवात्मक आणि उद्योग - समन्वित शिक्षणाला बळकटी देणारा हा उपक्रम डॉ. पल्लवी चंदवास्कर आणि डॉ. विभूती सावे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केला जात आहे.









१८ जानेवारी २०२६ : डॉ. नीतिन जोशी यांनी (टाटा मुंबई) हाफ मॅरेथॉनचे २१.०९ किलोमीटरचे अंतर १:५९:२५ वेळेत पूर्ण केले.

१८ जानेवारी २०२६: डॉ. पल्लवी चंदवास्कर यांना श्री अंबिका योग कुटीरच्या विक्रोळी शाखेतर्फे मुंबईतील विक्रोळी येथील विकास कॉलेजमध्ये 'योग आहाराद्वारे (Yogic Diet) सर्वांगीण कल्याण: भगवतगीतेतील धडे' या विषयावर मार्गदर्शन सत्र घेण्यासाठी प्रमुख वक्ता म्हणून आमंत्रित करण्यात आले आणि श्री अंबिका योग कुटीरच्या ७५ व्या योग तुकडीच्या पूर्ती सोहळ्यात त्यांचा सत्कारही करण्यात आला.






२४ जानेवारी २०२६: डॉ. पल्लवी चंदवास्कर यांचा डज जेंडर मॅटर्स? एक्सप्लोरिंग द ब्रँड पर्सनॅलिटी - लॉयलटी रेलशनशिप इन द इंडियन एफ एम सी जी मार्केट या शीर्षकाचा शोधनिबंध, टेलर अँड फ्रान्सिस यूके द्वारे प्रकाशित होणाऱ्या 'कॉजेंट बिझनेस अँड



मॅनेजमेंट' या प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये मध्ये प्रकाशित झाला. हे नियतकालिक स्कोपस-अनुक्रमित Q2 जर्नल असून वेब ऑफ सायन्समध्ये देखील अनुक्रमित आहे.

३१ जानेवारी २०२६ : डॉ. पल्लवी चंदवास्कर यांनी ब्रिम्स (BRIMS) मध्ये रोटरॅक्ट युथ लीडरशिप अवॉर्ड्स २०२६ चे आयोजन केले, या कार्यक्रमात डॉ. शिबानी कुमार यांनी 'भविष्यातील नेत्यांसाठी एआय' या विषयावर एक उत्कृष्ट सत्र घेतले. त्यानंतर नेतृत्व आणि संघबांधणीचे उपक्रम घेण्यात आले आणि मिस्टर व मिस रायला (RYLA) यांची निवड करण्यात आली. एमएमएस (MMS) प्रथम वर्षाची विद्यार्थिनी यशिका देसाई हिला 'मिस रायला' आणि (MMS) द्वितीय वर्षाचा विद्यार्थी शुभम पाटील यांना 'मिस्टर रायला' म्हणून सन्मानित करण्यात आले.



## महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर

दि.०१ जानेवारी २०२६ रोजी, महाविद्यालयातील संगणक अभियांत्रिकी विभागातील प्रा. राधिका कदम आणि श्री. दीपक जाधव यांनी शृंगारतळी येथील न्यू इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेजमध्ये इयत्ता ९ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी संगणक हार्डवेअर असेंब्ली या विषयावर प्रत्यक्ष प्रात्यक्षिक कार्यशाळा आयोजित केली. ही कार्यशाळा संवादात्मक व्याख्यान व थेट प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून घेण्यात आली. सत्रामध्ये विद्यार्थ्यांना संगणकातील विविध घटकांची ओळख करून देण्यात आली. तसेच हार्डवेअर असेंब्लीच्या मूलभूत बाबी समजावून सांगण्यात आल्या, ज्यामुळे त्यांना उपयुक्त प्रत्यक्ष ज्ञान मिळाले. एकूण ६५ विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला व संपूर्ण सत्रात विशेष उत्साह दाखवला, ज्यामुळे ही कार्यशाळा माहितीपूर्ण, रंजक व अत्यंत लाभदायक ठरली.

दि. ०४ जानेवारी २०२६ रोजी महाविद्यालयातील विविध विभागांतील विद्यार्थ्यांचे चालू शैक्षणिक वर्षातील नवीन सेमिस्टरच्या प्रारंभानिमित्त गुलाबपुष्प देऊन मनापासून स्वागत करण्यात आले. नवीन सेमिस्टरच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण व्हावे, उत्साह वाढावा, तसेच शैक्षणिक प्रवासाची सुरुवात आनंददायी व्हावी या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.



दि. ०६ जानेवारी २०२६ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश पवार व महाविद्यालय समन्वयक श्री. हृषिकेश गोखले यांनी पालशेत, गुहागर, शृंगारतळी व मार्गताम्हाणे येथील हायस्कूलचे मुख्याध्यापक, गुहागर पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक, तसेच मोडका आगर येथील टाटा मोटर्सचे संचालक श्री. प्रसाद वैद्य यांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा देऊन महाविद्यालयाची डायरी भेट स्वरूपात प्रदान केली.

दि. ०७ जानेवारी २०२६ रोजी महाविद्यालयाच्या यांत्रिकी अभियांत्रिकी (Mechanical Engineering) विभागाचे माजी विद्यार्थी श्री. अनिरुद्ध पवार व श्री. अथर्व शिर्के यांनी विद्यार्थ्यांसाठी एक प्रेरणादायी माजी विद्यार्थी संवाद

(Alumni Talk) सत्र घेतले. या सत्रामध्ये त्यांनी आपल्या शैक्षणिक व व्यावसायिक अनुभवांची माहिती दिली. सदर कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या अनुभवांतून मार्गदर्शन मिळाले व ज्ञानवृद्धीची उत्तम संधी प्राप्त झाली.




दि. ०८ जानेवारी २०२६ रोजी वन व वन्यजीव संवर्धन जनजागृती कार्यशाळा यशस्वीरीत्या आयोजित करण्यात आली. सदर कार्यशाळा कॉम्प्युटर सेंटर (श्रीपती इमारत) येथे संपन्न झाली. महाविद्यालयाच्या ग्रीन क्लब, सिव्हिल अभियांत्रिकी विभाग व इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेसाठी डॉ. राहुल भागवत (संस्थापक – Wildlife Educare) हे तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यांनी 'वनसंवर्धनाचे महत्त्व, वन्यजीव संरक्षणात समाजाची भूमिका, जैवविविधतेचे रक्षण व पर्यावरणीय संतुलन' या विषयांवर सखोल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी मोठ्या उत्साहाने कार्यशाळेत सहभाग नोंदवला. मार्गदर्शन करताना डॉ. राहुल भागवत यांनी सांगितले की, 'सह्याद्री पर्वतरांगांचा पर्यावरणीय समतोल बिघडल्यास त्याचा परिणाम संपूर्ण देशाच्या हवामान बदलावर होतो. कोकण प्रदेश जैवविविधतेने अत्यंत समृद्ध असून, या नैसर्गिक संपदेचे संरक्षण करणे ही काळाची गरज आहे. प्रत्येक नागरिकाने किमान तीन झाडे लावून पर्यावरण संवर्धनात योगदान द्यावे', असे आवाहन त्यांनी केले. Peregrine Falcon या पक्ष्याच्या सांगाड्यावर आधारित अभ्यासातून विमानाच्या वेगासंबंधी संशोधन करण्यात आले असल्याचे उदाहरण देत त्यांनी निसर्ग व आधुनिक विज्ञानातील नातेसंबंध स्पष्ट केला. पक्षी निरीक्षण व अभ्यासासाठी शासनाकडून शिष्यवृत्ती उपलब्ध असून, या क्षेत्रात कोकणातील विद्यार्थ्यांचा सहभाग वाढण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच सर्पांविषयी माहिती देताना त्यांनी स्पष्ट केले की, त्रिकोणी आकाराचे डोके असलेले साप विषारी असतात, तर लांबट व गोलाकार शरीर असलेले साप बहुधा बिनविषारी असतात. सर्पदंश झाल्यास अफवांवर विश्वास न ठेवता तात्काळ शासकीय रुग्णालयात उपलब्ध असलेल्या विषनिरोधक औषधोपचारांचा लाभ घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. रिया गवस, संयोजक प्रा. अनिकेत जाधव, सिव्हिल विभागप्रमुख प्रा. नंदकिशोर चौगुले, इलेक्ट्रिकल विभागप्रमुख प्रा. सतीश घोरपडे, तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाची यशस्वी अंमलबजावणी करण्यात आली.




स्वामी विवेकानंद यांच्या १६४ व्या जयंतीनिमित्त, तसेच राष्ट्रीय युवक दिनाचे औचित्य साधून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (AICTE) यांच्या मार्गदर्शनानुसार महाविद्यालयात 'रन फॉर स्वदेशी (स्वदेशी संकल्प रन)' या उपक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये एकूण ५८ विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी उत्साहाने सहभागी झाले.

यावेळी महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. संतोष चतुर्भुज यांनी उपस्थितांना शुभेच्छा देत स्वदेशी, आत्मनिर्भर भारत, शिस्त व राष्ट्रनिर्मितीचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांच्या उपस्थितीत धावण्याच्या स्पर्धेला हिरवा झेंडा

दाखवून सुरुवात करण्यात आली. सहभागी विद्यार्थी व कर्मचाऱ्यांनी मोठ्या उत्साहात, तसेच शिस्तबद्ध पद्धतीने या उपक्रमात सहभाग नोंदवला.

स्पर्धेचे निकाल पुढीलप्रमाणे जाहीर करण्यात आले. गट एक (पुरुष) : कु. साहिल इब्रांपूरकर (प्रथम क्रमांक), कु. साहिल खापरे (द्वितीय क्रमांक) व कु. शंतनू गुरव (तृतीय क्रमांक). गट दोन (महिला) : कु. वेदिका सकपाळ (प्रथम क्रमांक), कु. ईशा हेगिष्टे (द्वितीय क्रमांक) व कु. कुमुदिनी शिगवण (तृतीय क्रमांक).

विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. या कार्यक्रमाला ग्रंथपाल डॉ. संतोष चतुर्भुज, विविध विभागांचे विभागप्रमुख, क्रीडा समन्वयक प्रा. औदुंबर पाटकर व NSS समन्वयक यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल क्रीडा समिती, NSS स्वयंसेवक व सर्व सहभागींचे विशेष कौतुक करण्यात आले. हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये स्वदेशी विचारसरणी, शारीरिक तंदुरुस्ती, संघभावना व राष्ट्रभक्ती वृद्धिंगत करण्यासाठी निश्चितच प्रेरणादायी ठरला.




दि. १३ जानेवारी ते १७ जानेवारी २०२६ दरम्यान महाविद्यालयातील सर्व विभागांचा शैक्षणिक लेखापरीक्षण (Academic Audit) यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले.



दि. १५ जानेवारी २०२६ रोजी राष्ट्रीय स्टार्टअप दिनाच्या निमित्ताने एक विशेष कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रम महाविद्यालयाच्या कॉम्प्युटर सेंटर येथे संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी गुहागर येथील 'हाऊस ऑफ कोकोनट'चे मालक श्री. अमेय परचुरे हे प्रमुख मार्गदर्शक (Resource Person) म्हणून उपस्थित होते. त्यांनी आपल्या उद्योजकीय प्रवासाचा अनुभव विद्यार्थ्यांशी शेअर करत 'स्टार्टअप संधी, नवकल्पना, स्वदेशी उद्योग, तसेच आत्मनिर्भर भारत' या विषयांवर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी या सत्रात मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला.

सदर कार्यक्रमाचे आयोजन यांत्रिकी अभियांत्रिकी विभाग व इन्स्टिट्यूशन इनोव्हेशन कौन्सिल (IIC) यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश पवार, IIC अध्यक्ष प्रा. सतीश घोरपडे, यांत्रिकी विभागप्रमुख प्रा. हृषिकेश भावे, तसेच कार्यक्रम समन्वयक प्रा. स्वानंद जोशी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेची आवड निर्माण करणारा व प्रेरणादायी ठरला.



दि. १५ जानेवारी २०२६ रोजी गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक, पणजी (गोवा) येथे 'Electrical Safety' या विषयावर दोन तासांचा सेमिनार आयोजित करण्यात आला. या सेमिनारसाठी डिप्लोमा इलेक्ट्रिकल शाखेतील द्वितीय व तृतीय वर्षाचे एकूण ५८ विद्यार्थी उपस्थित होते. सदर सेमिनारासाठी प्रा. योगेश काटदरे हे प्रमुख व्याख्याते म्हणून उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमासाठी विद्युत विभागप्रमुख व विभागातील सर्व प्राध्यापक आवर्जून उपस्थित होते.

सेमिनारनंतर महाविद्यालयाचे प्राचार्य यांची भेट घेण्यात आली. यावेळी विद्युत विभागप्रमुख सौ. सुनीता फल व महाविद्यालयाचे प्राचार्य शेट्ये सर यांना भेट म्हणून महाविद्यालयाची डायरी प्रदान करण्यात आली.




दि. १६ जानेवारी २०२६ रोजी सिव्हिल इंजिनीअरिंग विभाग व संशोधन व विकास (RD) कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने Why Research Papers Get Rejected: Key Insights या संशोधनाधारित विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. ही कार्यशाळा महाविद्यालयाच्या कॉम्प्युटर सेंटर (श्रीपती इमारत) येथे संपन्न झाली.

या कार्यशाळेसाठी डॉ. संतोष चतुर्भुज (Ph.D. - Library Information Science) हे संसाधन व्यक्ती म्हणून उपस्थित होते. त्यांनी संशोधन लेख नाकारले जाण्याची प्रमुख कारणे, योग्य जर्नलची निवड, संशोधन लेखनातील सामान्य त्रुटी, संदर्भ व्यवस्थापन, तसेच प्रकाशन प्रक्रियेतील विविध बारकावे याबाबत सखोल मार्गदर्शक माहिती दिली.

कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. रिया गवस (समन्वयक), प्रा. राहुल कुंडिया (RD कक्ष प्रमुख), प्रा. नंदकिशोर चौगुले (सिव्हिल विभागप्रमुख) तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश पवार यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या कार्यशाळेसाठी प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संशोधन क्षेत्रात कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना ही कार्यशाळा अत्यंत उपयुक्त व मार्गदर्शक ठरली.



दि. १६ जानेवारी २०२६ रोजी गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक, डिचोली (गोवा) येथे Electrical Safety या विषयावर दीड तासांचा सेमिनार आयोजित करण्यात आला. या सेमिनारसाठी डिप्लोमा इलेक्ट्रिकल शाखेतील तृतीय वर्षाचे एकूण २९ विद्यार्थी उपस्थित होते. सदर सेमिनारासाठी प्रा. योगेश काटदरे हे प्रमुख व्याख्याते म्हणून उपस्थित होते.

दिनांक १९ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत महाविद्यालयाचा वार्षिक सांस्कृतिक व क्रीडा महोत्सव 'सप्तक २०२६' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या महोत्सवाअंतर्गत क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, कला सादरीकरणे, समूह नृत्य, गायन, नाट्यप्रयोग, तसेच विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणारे विविध उपक्रम आयोजित करण्यात आले. या महोत्सवामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळाली असून, शैक्षणिक ताणतणावातून मुक्त होत त्यांनी आपली सर्जनशीलता व्यक्त केली. तसेच


विद्यार्थ्यांमध्ये संघभावना, नेतृत्वगुण व क्रीडावृत्ती विकसित होण्यास मदत झाली.

'सप्तक २०२६' अंतर्गत साजऱ्या झालेल्या Traditional Day निमित्ताने श्री गणरायाची मूर्ती प्रतिष्ठापना करून मिरवणूक, आरती, भजने व जाखडी यांमुळे संपूर्ण परिसर भक्तिमय झाला. या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले ते हॉस्टेलमधील विद्यार्थ्यांनी सकाळी ६ वाजल्यापासून एकत्र येत अत्यंत नियोजनबद्ध व स्वयंप्रेरणेने तयार केलेले ३०० हून अधिक मोदकांचे प्रसाद, जे उत्कृष्ट टीमवर्क व एकोप्याचे दर्शन घडवणारे ठरले. विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण महाविद्यालय परिसर उत्साह, आनंद, सृजनशीलता व परंपरेप्रती आदराने भारलेला होता.






दिनांक २३ जानेवारी २०२६ रोजी महाविद्यालयातील संगणक अभियांत्रिकी विभागाचे विभागप्रमुख प्रा. केतन कुंडीया यांचे विशेष व्याख्यान पार पडले. राजाराम शिंदे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीअरिंग अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी (RSIET), पेढांबे येथे Java and Artificial Intelligence या विषयावर आयोजित तज्ज्ञ व्याख्यान व एकदिवसीय कार्यशाळा यशस्वीपणे संपन्न झाली. या कार्यशाळेमध्ये अंतिम वर्षाच्या संगणक अभियांत्रिकी शाखेतील एकूण ३५ विद्यार्थी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. या सत्रामध्ये विद्यार्थ्यांना 'कोर जावा संकल्पना' तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेची मूलतत्त्वे व्यावहारिक उदाहरणांच्या माध्यमातून समजावून सांगण्यात आली. कार्यशाळा संवादात्मक स्वरूपाची असून विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.




दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी महाविद्यालयात ७७ वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी आणि कर्मचारी वर्गाने उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. यावेळी देशभक्तीचे संदेश, भाषणे आयोजित करून विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीयत्वाची जाणीव जागृत केली गेली. प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना संघभावना, शिस्त आणि देशभक्तीची भावना बळकट करण्याचे प्रयत्न केले.



Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

❉ अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
❉ वातानुकूलित प्रसन्न वातावरण
❉ वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा
अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०
Email : vpmt1935@gmail.com

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे – ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे–४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे – ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.